

महात्मा फुले स्मृतिशताब्दी

# जोतीबा फुले
आणि
# स्त्री-मुक्तीचा विचार

MR 891.468
A 95 J

डॉ. गेल ऑम्व्हेट

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

"स्थापाया अधिकार मी झटतसे..."

# जोतीबा फुले आणि स्त्री-मुक्तीचा विचार

डॉ. गेल ऑम्व्हेट

दराज
Enter

लोकवाङ्मय गृह

जोतीबा फुले आणि स्त्री-मुक्तीचा विचार / डॉ. गेल ऑम्व्हेट

Library IIAS, Shimla
MR 891.468 A 95 J
00124302

म / ९८५
© डॉ. गेल आम्व्हेट
पहिली आवृत्ती (II) : नोव्हेंबर १९९०
दुसरी आवृत्ती (I) : मार्च १९९८
तिसरी आवृत्ती (I) : मार्च २००७

MR
891.468
AM 95 J

मुखपृष्ठ : कमल शेडगे

मूल्य : २० रुपये

124302
31-3-08

मुद्रक/प्रकाशक
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | प्रास्ताविक | १ |
| २. | फुल्यांचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन | ४ |
| ३. | जोतीबांचे स्त्री-शिक्षणाचे कार्य | ९ |
| ४. | जोतीबा, सावित्रीबाई व बहुजन समाज कुटुंब | १३ |
| ५. | स्त्री-मुक्तीसाठी पुढे येणाऱ्या त्या काळातील स्त्रिया | १७ |
| ६. | ताराबाई शिंदे : स्त्री-मुक्तीच्या क्रांतिअग्रणी | २२ |
| ७. | पितृसत्ताकतेच्या शोधात जोतीबा | २६ |
| ८. | कुटुंबसंस्थेची पुनर्रचना | ३० |
| ९. | "स्थापाया अधिकार मी झटतसे" | ३६ |
| १०. | स्त्री-मुक्ती विचारांची पुढची झेप | ३९ |



Library IIAS, Shimla
MR 891.468 A 95 J
00124302

महात्मा जोतीराव फुले स्मृतिशताब्दीनिमित्त त्यांच्या मूलभूत विचारांवर पुस्तिकांच्या रूपाने ऊहापोह करणारा उपक्रम करावा असे आमच्या मनात आले. विद्यमान भारतीय व महाराष्ट्रातील एकूणच वैचारिक व मानसिक स्थितिगती पाहताना पुन्हा एकदा नव्याने महात्मा फुल्यांच्या कार्याचा मागोवा घ्यावा, जेणेकरून सर्वसाधारण वाचकांना आणि कार्यकर्त्यांना त्यांच्या विचारांच्या व कार्याच्या एकेका महत्त्वपूर्ण विभागाचा मूळ गाभा परिचित व्हावा हा या उपक्रमामागील हेतू आहे. वैचारिक संघर्षात गुंतलेल्या आपणा सर्वांना त्यातील गांभीर्य कळले तर ती चळवळ अधिक वस्तुनिष्ठ व भक्कमपणे उभी राहते, असा अनुभव आहे.

ह्या पुस्तिका-मालिकेत लेखन करणारी ही सर्व विचारवंत मंडळी आपला प्रागतिक वारसा सांगत व समोरच्या समस्यांची वैज्ञानिक दृष्टिकोनातून उकल करू पाहणारी आणि वस्तुनिष्ठ भूमिका ठेवून प्रबोधनाच्या सर्वव्यापी चळवळीत गुंतलेली अशी आहेत.

वाचक आणि कार्यकर्ते ह्या मालेचे स्वागत करतील असा पूर्ण भरवसा आम्हाला आहे.

**– प्रकाशक**

# प्रास्ताविक

"तत्त्वज्ञान्यांनी वेगवेगळ्या प्रकारे जगाचा फक्त अर्थ लावला आहे; मुद्दा आहे ते (जग) बदलण्याचा" अशी कार्ल मार्क्सची एक महत्त्वाची मांडणी आहे. मार्क्सच्याच काळात जगाच्या दुसऱ्या बाजूला जोतीबा फुले नावाचा शेतकरी समाजातला माणूस "जग बदलण्याच्या" स्वत:च्या मोहिमेत सामील झाला होता. त्याने समताधिष्ठित, स्त्री-मुक्तिवादी व जातिविहीन समाज निर्माण करण्याची भूमिका मांडली.

२८ नोव्हेंबर १९८९ ते २८ नोव्हेंबर १९९० हे जोतीबा फुल्यांचे स्मृती शताब्दी वर्ष आहे. या वर्षाला सध्या देशात तयार झालेल्या परिस्थितीची पार्श्वभूमी आहे. सर्व जगच एका प्रचंड सामाजिक-राजकीय मंथनामध्ये सापडले आहे. देशात गेली शंभर वर्षे प्रमुख स्थानी असलेली काँग्रेस समाजमनातून उतरणीला लागलेली आहे. जात-जमातवादी पक्ष व संघटना उसळी मारून वर आल्या आहेत. तरीही या शक्तींचा सार्वत्रिक विजय जनतेने होऊ दिलेला नाही. जगात एका बाजूला साम्राज्यवादाच्या राजकीय गुलामगिरीतून मुक्त होण्याचे संघर्ष हळूहळू पुढे सरकत आहेत. मक्तेदार, बहुराष्ट्रीय भांडवली कंपन्यांचे अड्डे असलेल्या युरोप व अमेरिकेत पर्यावरण संतुलन व समता या पायावर नव्या चळवळी उदयाला आल्या आहेत. शस्त्रास्त्रविरोधी, अण्वस्त्रविरोधी शांततेच्या चळवळी वाढत आहेत. दुसऱ्या बाजूला पूर्व युरोपमध्ये गेली ४०-४५ वर्षे सत्तेवर असलेली कम्युनिस्ट पक्षांची सरकारे तिथल्या जनतेने निवडणुकीच्या मार्गाने पाडली आहेत. रशियातील कम्युनिस्ट पक्षाने व शासनाने 'पुनर्रचना' व 'खुलेपणा' अशी नवी धोरणे राबवायला सुरुवात केली आहे. त्यातून अनेक नवे प्रश्न तयार झाले आहेत.

कामगार, शेतमजूर, कष्टकरी, शेतकरी अशी शोषित जनता समाजवाद आणण्याविषयी, कष्टकऱ्यांची लोकशाही प्रस्थापित करण्याविषयी आस्था दाखवतात, तळमळ दाखवतात. पण जुने पक्ष, जुने मार्ग यांविषयी शंका व्यक्त करतात. कधी नाकारतात.

तरी गेल्या दोन दशकांमध्ये पिळवणूक, दडपशाही, प्रदूषण, जातजमातवाद, दुष्काळ इत्यादींविरुद्ध नव्या चळवळी उभ्या राहिल्या. कामगार, शेतमजूर, शेतकरी यांच्याबरोबरच स्त्री-मुक्तीच्या, पर्यावरणाच्या जात-जमातवादविरोधी चळवळी उभ्या राहिल्या. नव्या संदर्भात नव्या मागण्या घेऊन शेतकऱ्यांच्या चळवळी उभ्या राहिल्या.

अशा काळात जोतीबांचा विचार, त्यांचे कार्य यांचे मूल्यमापन करणे फार महत्त्वाचे आहे. त्यांनी शंभर वर्षांपूर्वी दडपलेल्या जातींचे शोषण, स्त्रियांची गुलामगिरी, शेती-पर्यावरणाचा प्रश्न, शेतकऱ्यांची लूट, शिक्षण यांविषयी नवे व मूलभूत विचार मांडले.

कार्ल मार्क्सप्रमाणेच त्यांनी समाजातील अंतर्विरोध, शोषण, दडपणूक या प्रश्नांवर भर दिला व पिळवणुकीविरुद्ध आवाज उठवला. पण त्यांनी राजकीय सत्तेच्या जोरावरचा हिंसाचार आणि धर्माच्या आधारावर फसवणूक, दडपणूक यांना जास्त महत्त्व दिले. वर्गीय शोषणाविषयी त्यांच्या विचारात फारच त्रोटक उल्लेख येतात. त्याऐवजी जात व समाज यांना त्यांनी शोषणाचे घटक म्हणून मूलभूत महत्त्व दिलेले दिसते. त्यांनी पुकारलेल्या लढ्याचे स्वरूप 'कामगार विरुद्ध भांडवलदार' असे असण्याऐवजी 'शूद्र-अतिशूद्र विरुद्ध भट, जमीनदारशाही व शासन' असे होते.

देशातील दारिद्र्य हटवण्यासाठी त्यांनी जड उद्योग, मोठे कारखाने यांवर भर दिलेला नाही. विकासाचा मार्ग म्हणून त्यांनी शेती-सुधारणांवर जोर दिलेला दिसतो. 'नॅशनल काँग्रेस'सारखा पक्ष ब्राह्मणांचे प्रभुत्व असलेला असल्यामुळे तो भारताला एकसंध राष्ट्र बनवू शकणार नाही. त्यांच्या धुरीणत्वाखाली पूर्वीच्या पेशवाईप्रमाणे पिळवणूक, फसवणूक होणार अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

जोतीबा फुल्यांचे संपूर्ण विचार, सर्व दृष्टिकोन शास्त्रीय निकषांवर बरोबर आहेत असे आम्हाला म्हणायचे नाही. त्यांच्या मांडणीवर काळाच्या आणि परिस्थितीच्या मर्यादा होत्याच. तथापि आपण जेव्हा एकंदर मानवमुक्तीचा मार्ग शोधतो तेव्हा मार्क्स, लेनिन, माओ इत्यादींबरोबरच जोतीबा फुले यांच्या भूमिकेबद्दल विचार करणे योग्य आणि आवश्यक आहे असे आम्हाला वाटते.

स्त्रियांच्या दृष्टीने जोतीबा फुले भारतातल्या स्त्री-मुक्ती चळवळीचे संस्थापक होते असे मानले जाते. पण खूप वेळा जोतीबांचे नाव सांगणारे जोतीबांचा विचार दुर्लक्षित करतात. स्त्रियांच्या प्रश्नांविषयी असे निश्चितच झाले आहे असे दिसते. 'करू पहिलं नमन जोतीबाला, ज्यानं स्त्री-मुक्तीला जन्म दिला' असे म्हणणारे लोक केवळ जोतीबांच्या स्त्री-शिक्षणाच्या कामाविषयी बोलतात. खरे म्हणजे याच्यापलीकडे जाऊन जोतीबांनी केवळ ब्राह्मणी कुटुंबांत नव्हे तर बहुजन समाजासह एकूण कुटुंबातील पुरुषांच्या एकाधिकारशाहीविरुद्ध व व्यभिचाराविरुद्ध हल्ला केला तेव्हा

त्यांच्या काही पुरुष सहकाऱ्यांबरोबरसुद्धा त्यांचे भांडण झाले ही वस्तुस्थिती आहे. शिक्षणाची स्तुती करणे सोपे आहे पण ब्राह्मणांनी ब्राह्मण्याला विरोध करणे अवघड असते. तसेच पुरुषांनी पुरुषप्रधानतेला विरोध करणेसुद्धा अवघड असते हे स्पष्ट नाही का?

वस्तुस्थिती अशी आहे की, मुलींच्या शाळा काढणारे आणि सर्व त्रास सहन करून शिकवणारे जोतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे चित्र नेहमीच आपल्यासमोर आहे. पण ताराबाई शिंदे यांच्या बाजूला उभे राहून सर्व पुरुषी एकाधिकारशाहीवर हल्ला करणारे फुले आपल्याला फारसे दिसत नाहीत, ही एक ऐतिहासिक शोकांतिका आहे.

आज स्त्री-मुक्ती चळवळ ग्रामीण, दलित, आदिवासी स्त्रियांपर्यंत पोहोचून नवीन टप्प्यावर उभी राहत आहे. अत्याचारविरोधी लढ्याच्या चौकटीत न राहता स्त्रियांचे वेगवेगळे प्रश्न हातात घेऊ लागली आहे. स्त्रियांचा वारसा हक्क, मालमत्तेचा हक्क, राजकीय सत्तेत सहभाग, परित्यक्ता स्त्रियांचे हक्क, असे प्रश्न लढ्यात घेतले जात आहेत. याचबरोबर जुनी जातीयवादी पितृसत्ताक कुटुंबसंस्था नष्ट करून नवीन समताधिष्ठित कुटुंबसंस्था प्रस्थापित करण्याचे प्रयत्न चालू आहेत. कुटुंबसंस्थेत पुनर्रचना करण्याचे आंदोलन जोतीबा फुल्यांनी शंभर वर्षांपूर्वी सुरू केले.

परित्यक्ता स्त्रियांचे प्रश्न मांडून स्त्रियांचा अधिकार स्थापन करण्याच्या दृष्टीने नवीन सत्यशोधक विवाह पद्धत, 'सार्वजनिक सत्यधर्माची नवीन नीतिमूल्ये' त्यांनी मांडली. या सगळ्यात त्यांचे खरे 'माहात्म्य' होते. ब्राह्मण त्यांचे 'ब्राह्मण्य' सोडून बहुजन कष्टकऱ्याच्या किंवा जातिव्यवस्थेविरोधी चळवळीत सहभागी होऊ शकतात. तसेच पुरुष त्यांची 'पुरुषी वर्चस्ववादी' प्रवृत्ती सोडून स्त्री-मुक्ती चळवळीचे सहकार्य करू शकतात याचा महत्त्वाचा ऐतिहासिक पुरावा म्हणजे महात्मा जोतीराव गोविंदराव फुले.

■

# फुल्यांचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन

सध्या 'फुले-आंबेडकरवाद' या विषयावर चर्चा चालू आहे. 'फुलेवाद' किंवा 'आंबेडकरवाद' म्हणजे मार्क्सवादाला एक वैचारिक पर्याय आहे किंवा मार्क्सवादाच्या उणिवा भरून काढण्यासाठी महत्त्वाची साधने आहेत असे सूर या चर्चेत आहेत. पण या चर्चांमधून फुलेवाद म्हणजे नेमके काय आहे ते स्पष्ट होत नाही. खूप वेळा लोक जेव्हा 'वर्ग' या संकल्पनेऐवजी 'जात' या संकल्पनेच्या आधारावर बोलतात तेव्हा मानवी समाजातील सामाजिक-भौतिक संबंधांपेक्षा धर्म, संस्कृती या गोष्टी निर्णायक आहेत एवढेच सांगितले जाते.

या संदर्भात जोतीबा फुल्यांचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन काय होता, त्यात स्त्रियांचे स्थान काय होते हे पाहणे महत्त्वाचे ठरते.

या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आधी जोतीबांच्या काळाचे वैशिष्ट्य ध्यानात घेतले पाहिजे.

ज्या वेळी कार्ल मार्क्स व जोतीबा फुले आपला विचार घेऊन उदयाला आले त्या वेळी जागतिक भांडवली व्यवस्थेचे औद्योगिक व साम्राज्यशाही स्वरूप उदयाला आले. युरोपमध्ये नवीन गिरण्या-कारखाने उभे राहिले, आफ्रिकेतून गुलामांचा व्यापार सुरू होऊन त्यांच्या श्रमावर ऊस-मळे व दारूचा उद्योग उभा राहिला. भारतातून कापूस, अफू, नीळ, रेशीम निर्यात होऊ लागले. या गोष्टी शेती विभागातून आणून निर्यात करण्यासाठी जंगल तोडून रेल्वे यंत्रणा उभी राहू लागली.

पण या जागतिक भांडवली व्यवस्थेत वेगवेगळ्या देशांच्या स्थानांमध्ये फरक होता. इंग्लंड हें कारखाने-उद्योगांचे केंद्र आणि भांडवलदार-मजूर अशा सार्वत्रिक संबंधांचे क्षेत्र बनले होते. भारत मात्र कच्चा माल पुरवणारा, शेतीप्रधान, सरंजामी संबंध व जातिव्यवस्था सर्वदूर अस्तित्वात असलेला देश होता. इंग्रज भांडवलदारांनी भारताचा कब्जा घेतल्यानंतरसुद्धा भारतातली बहुसंख्य जनता शेतीवर अवलंबून होती. इंग्रजी औद्योगिक कापडामुळे आणि दडपशाहीमुळे कारागिरांचे धंदे बंद पडून तेसुद्धा अर्धपोटी जीवन जगू लागले. शेतकऱ्यांच्या कष्टातून तयार झालेले वरकड

मूल्य लुटण्यासाठी व त्यांना पीक बाजारात विकायला लावण्यासाठी जबरदस्त जमीन कर लावले गेले होते. या करावर ब्रिटिशांचे राज्य, या राज्याच्या सर्व खात्यांची नोकरशाही आणि राज्याचे संरक्षण करणारी यंत्रणा पोसली जात होती.

यामुळे कार्ल मार्क्सपेक्षा फुल्यांसमोर अगदी वेगळा समाज आणि त्यातले संबंध उभे होते. भांडवलशाहीच्या केंद्रात राहिल्यामुळे मार्क्सला औद्योगिक भांडवलशाहीची वाढ, पगारी कामगारांच्या श्रमातून भांडवलदारांनी वरकड मूल्य ओरबाडून घेण्याची प्रक्रिया या गोष्टी स्पष्ट दिसत होत्या. या केंद्राच्या बाहेर चालणारे शेतकऱ्यांचे शोषण, गुलामांच्या व्यापारातून होणारी महाभयंकर दडपणूक, सरंजामी व्यवस्थेचा भांडवल संचयासाठी होणारा वापर या गोष्टींची नोंद मार्क्सने घेतली असली तरी त्या प्रक्रिया त्याला अगदी स्पष्टपणे दिसत नव्हत्या.

गावातले सवर्ण मजूर आणि गावाबाहेर राहणारे दलित मजूर एकाच व्यवस्थेमध्ये राहून काही बाबतीत वेगळ्या प्रकारचे शोषण सहन करतात. एका विभागावर लादला जाणारा जातीय छळ आणि वेठबिगारी या गोष्टी दुसऱ्या विभागाला सरळ सरळ जाणवत नाहीत. त्याचप्रमाणे युरोप-अमेरिकेतील औद्योगिक कामगार, शेतकरी, मजूर इत्यादी आणि आशिया-आफ्रिकेतील शेतकरी, बाराबलुतेदार, दलित, गुलाम एकाच व्यवस्थेत शोषणाच्या वेगवेगळ्या परिस्थितीत जगत होते. पण आशिया-आफ्रिकेतील शोषण व दडपणुकीच्या प्रक्रियेचे विश्लेषण सविस्तर आणि फारसे खोलात जाऊन होऊ शकले नव्हते.

मार्क्सने 'प्राथमिक भांडवल संचय' या विषयासंदर्भात असे म्हटले आहे :

"अमेरिकेत सापडलेले सोने आणि चांदी, खाणीमध्ये होणारी आदिवासी समाजाची लूट, गुलामीकरण आणि त्यांचे त्या खाणीत थडगे बांधले जाणे, इस्ट इंडीज देशांच्या लुटीची आणि त्यांचा ताबा घेण्याची सुरुवात, काळ्या कातडीची व्यापारी शिकार करण्याचे क्षेत्र म्हणून झालेले आफ्रिकेचे परिवर्तन या गोष्टींनी भांडवली उत्पादनपद्धतीची गुलाबी पहाट होण्याचा सिग्नल दाखविला... या पद्धती अंशत: रानटी हिंसाचारावर अवलंबित असतात. उदाहरणार्थ, वासाहतिक व्यवस्था पण त्या सर्व सरंजामी उत्पादनपद्धतीचे परिवर्तन भांडवली उत्पादनपद्धतीत वेगाने करण्यासाठी समाजाची संपृक्त आणि संघटित शक्ती असणाऱ्या शासनसत्तेची ताकद वापरतात... बळाचा वापर ही नव्या समाजाचा गर्भ धारण करणाऱ्या प्रत्येक जुन्या समाजाची सुईण आहे. तो (बळाचा वापर) स्वत:च एक आर्थिक शक्ती आहे." (भांडवल, खंड १, 'औद्योगिक भांडवलदाराची उगमप्रक्रिया')

याचा अर्थ लूट, हिंसाचार व शासनाची प्रत्यक्ष शोषण करण्याची भूमिका याची नोंद मार्क्सने घेतली आहे. मात्र प्राथमिक भांडवल संचयाचा काळ भांडवलशाही स्थिर

झाल्यावर संपतो आणि तो भांडवलशाहीच्या चलनवलनाचा अविभाज्य भाग नसणार असे मार्क्सला वाटते. पण वासाहतिक देशात जीवन जगणाऱ्या जोतीबा फुल्यांना लूट, हिंसाचार व शासकीय शक्ती यांचे भयंकर राक्षसी स्वरूप जिवंतपणे जाणवले.

खाजगी मालमत्तेच्या आधारावर होणारी शोषणाची प्रक्रिया जोतीबांना फारशी महत्त्वाची वाटत नव्हती असे दिसते. त्याऐवजी शासन यंत्रणेचा वापर करून जमिनीवर कर बसवण्यातून होणारे शोषण व शेतकऱ्याची लूट करून आरामात जगणारी नोकरशाही यंत्रणा आणि अन्य सामाजिक थर त्यांना स्पष्ट दिसत होते. राज्य ब्रिटिशांचे होते पण या राज्याच्या नोकरशाहीमध्ये ब्राह्मण जातीयांचा भरणा होता. कोर्ट-कचेऱ्या इत्यादी ठिकाणी विविध स्थानांवर असणारे 'सरकारी भट-कामगार' (कर्मचारी-अधिकारी) शेतकऱ्यांची पिळवणूक करतात अशी त्यांची मांडणी होती.

उत्पादनसाधनांच्या मालकीच्या जोरावर ब्रिटिशांनी राजकीय सत्ता हस्तगत करण्याऐवजी शस्त्राच्या जोरावर राजा-महाराजांचा पराभव करून ती हस्तगत केली असा त्यांचा समज दिसतो. ब्रिटिशांच्या आधी मुस्लीम राज्यकर्त्यांचे आक्रमण, त्यांच्या आधी अगदी प्राचीन काळात आर्यांचे आक्रमण असे भारताच्या इतिहासाबाबतचे चित्र जोतीबांच्या डोळ्यांसमोर होते. सुरुवातीपासून बाहेरच्या लोकांनी देशावर स्वाऱ्या केल्या आणि स्थानिक शेतकऱ्यांची लूट करून जबरदस्तीने शासन बसवले. या सर्वांमध्ये सर्वात भयंकर पद्धतीने लुटणारे व फसवणारे म्हणजे पहिले आक्रमक आर्य-ब्राह्मण असे विश्लेषण फुल्यांच्या मनात ठाम होते. त्यांच्या इतिहासाच्या चित्रानुसार अगदी प्राचीन काळात मूळ भारतीय रहिवाशांमध्ये गरीब-श्रीमंत भेद नव्हते, जातिभेद नव्हते, फक्त या जनतेवर कल्याणकारी राजा असलेल्या बळीराजाचे राज्य होते. जोतीबा, खंडोबा इत्यादी. या बळीराजाचे सुभे सांभाळणारे सुभेदार होते. बाकी सर्व शेतकरी व सर्वच लढणारे 'क्षत्रिय'सुद्धा होते. आर्यांचे आक्रमण झाल्यावर त्यांनी या क्षत्रियांमध्ये जातिभेद पाडले. सर्वांत निर्धाराने आणि अखेरच्या क्षणापर्यंत लढणाऱ्यांना आर्य-ब्राह्मणांनी महा-अरी (महार), मांग इत्यादी म्हणून अस्पृश्य ठरवून सर्वात खालच्या जातीत 'गावाबाहेर' ढकलले. इतरांना शेतकरी व बलुतेदार केले. स्त्रियांना नवऱ्यांच्या अधिकाराखाली गुलामगिरीत टाकले. या सर्वांवर शिरजोर म्हणून स्वतः धूर्त आर्य धर्माचा खोटा आधार सांगून श्रेष्ठ ब्राह्मण बनले. असा थोडक्यात जोतीबांचा भारताच्या इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन होता.

भारताच्या इतिहासाचा अर्थ लावण्यात ज्या काळात 'आर्य-अनार्य' सिद्धान्त महत्त्वाचा होता त्या काळात जोतीबांनी या प्रकारे विचार केला आहे, त्याचबरोबर समाजातल्या परंपरा आणि ब्राह्मणी परंपरा यांच्यातील त्यांना दिसलेल्या अंतर्विरोधांचा आधारही जोतीबांनी घेतला आहे. जोतीबांच्या या दृष्टिकोनातल्या मर्यादा व उणिवा

यांचा विचार आपल्याला वेगळ्या ठिकाणी करावा लागेल. या ठिकाणी या सर्व लुटीच्या इतिहासामध्ये स्त्रियांचे स्थान काय होते याविषयी जोतीबांनी मांडलेल्या विचाराकडे लक्ष वेधले पाहिजे.

शोषणाची प्रक्रिया लूट, चोरी यांपासून सुरू झाली व या लुटारूंमध्ये व चोरांमध्ये स्त्रिया सहभागी नव्हत्या; त्या नेहमीच लुटीच्या बळी होत्या अशी साधारणपणे जोतीबांची भावना होती. 'सार्वजनिक सत्यधर्म' या त्यांच्या पुस्तकात 'दुष्टाचरण' या विषयावर लिहिताना त्यांचा हा विचार स्पष्ट होतो. ते म्हणतात की, "दुष्टाचरण हे माणसाच्या आळशीपणापासून सुरू झाले. काही माणसांना मेहनत व कष्ट करून जगण्यापेक्षा चोरी करून जगणं बरं वाटू लागलं." पण या शस्त्र घेणाऱ्या चोरांमध्ये स्त्रिया नव्हत्या असे त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. अशी लुटीची प्रक्रिया केवळ भारतातच नव्हे तर सगळीकडे कशी झाली हे मांडताना जोतीबांनी अत्यंत विदारक चित्र उभे केले आहे.

"तिसरे : या सर्व पृथ्वीचे पृष्ठभागावर बहुतेक देशातील लोभी लक्षाधीश (स्त्रिया नव्हेत) पुरुष, शेजारचे निर्बल मानव बांधवांचे देश काबीज करण्याकरिता, भलत्यासलत्या कुरापती काढून आपआपल्या लावलष्करासहित दलभारास बरोबर घेऊन दुसऱ्याचे मुलखात स्वाऱ्या करितात, त्या वेळी उभयतांमध्ये तुंबळ युद्ध चालू असता शेतकी, व्यापार, कारखाने वगैरे अनेक लहान मोठे धंदे बंद पडून चोहोकडे काळोखमय दुःखाचे धुके पसरून कोणास कोणी ओळखू येत नाही. अनेक ठिकाणी निर्दय पेंढारी कहीवाले यांची लूट धुमाळी चालू असल्याने कित्येक घरंदाज श्रीमंतांचे, कंगाल होऊन दाण्यास महाग होतात आणि बहुतेक शेतकऱ्यांची जनावरे; तृणावाचून मरू लागतात. त्यामुळे कित्येक कुटुंबवत्सल शेतकरी आपली मुले-माणसे व गुरेढोरे बरोबर घेऊन परागंदा होतात, त्यामुळे कित्येक खेडीपाडी ओसाड पडतात. एकाचे स्वार्थबुद्धीवरून दोन्ही पक्षातील टोलेजंग सैन्ये एकमेकांशी लढताना लक्षावधी शिपाई आपल्या अमोल जीवनास मुकतात व तेणेकरून हजारोहजार स्त्रियांचे कपाळी वैधव्य आल्यामुळे त्यांना आपले शेवटले आयुष्य परमसंकटात व दुःखात कंठावे लागते. कित्येक स्त्रिया एकुलत्या एक पुत्राचा शोक करून, हाय तोबा, हाय तोबा करीत करीत यमाजीचा दरबार गाठितात आणि कित्येक पोरकी मुलीमुले अन्नवस्त्रास मोताद होऊन जिकडे तिकडे दया दया, भया भया करीत फिरतात... या सर्व अफाट जहामर्द पुरुषांचे महापुरात नावाला मात्र पाचपंचवीस धाडशी स्त्रिया असतील... या सर्व वृत्तांवरून स्त्रिया अथवा पुरुष यांपैकी ज्यास्ती साहसी कोण?"

मार्क्स-एंगल्स यांच्या विश्लेषणामध्ये खाजगी मालमत्तेच्या उगमामुळे स्त्रियांचा 'जागतिक-ऐतिहासिक' पराभव झाला अशी मांडणी आहे. जोतीबांच्या लेखनात

स्त्रियांची गुलामगिरी लुटीच्या व्यवस्थेच्या सुरुवातीपासून होती आणि या व्यवस्थेशी संबंधित रीतीने तिचा उगम झाला असा समज दिसतो. स्वाऱ्या, लुटालूट हे प्रकार सुरू झाले. लुटारूंमध्ये स्त्रिया नव्हत्या. आणि जेव्हा जिंकणाऱ्या पुरुषांनी मूळ पराभूत लोकांना दास म्हणून ठेवण्यासाठी धर्मग्रंथ लिहायला सुरुवात केली तेव्हा त्यांनी त्यांच्यापैकी स्त्रियांना आणखी दुय्यम स्थान ठरवून दिले. पुरुष व ब्राह्मणांची सेवा करायला सांगितले. ब्राह्मणांचा सर्वाधिकार आणि पातिव्रत्याच्या नावाखाली कुटुंबप्रमुखांचा सर्वाधिकार या जोडगोळीला प्रस्थापित केले. यामुळे शोषण करणाऱ्या ब्राह्मणांच्या घरी आणि ज्यांचे शोषण होते अशा शूद्र-अतिशूद्रांच्या घरी अशा दोन्ही बाजूला स्त्रियांची दडपणूक सुरू झाली. अशा प्रकारे याविषयी जोतीबांनी स्वत:चा दृष्टिकोन मांडला आहे.

■

# जोतीबांचे स्त्री-शिक्षणाचे कार्य

१८४८ मध्ये फुल्यांनी त्यांच्या सामाजिक कार्याचे पहिले पाऊल म्हणून पुण्यात मुलींसाठी एक शाळा सुरू केली. यानंतर त्यांनी एक समिती स्थापन करून आणखी दोन शाळा उघडल्या. दलित (महार-मांग) मुलांसाठी एक शाळा सुरू केली. स्त्री शिक्षिका मिळत नसल्यामुळे त्यांची बायको सावित्रीबाई यांनीच शिक्षिका म्हणून काम सुरू केले. त्या सर्व त्रास, अपमान, शिव्या सहन करून जोतीबांच्या बरोबर ठामपणे उभ्या राहिल्या. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेपासूनच मुलींना शिक्षण देणे हे समाजाचे महत्त्वाचे ध्येय होते. १८८२ मध्ये हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेल्या निवेदनाच्या शेवटी फुले म्हणतात, "सरतेशेवटी मला शिक्षण आयोगाला एक विनंती करावयाची आहे. ती ही आहे की, त्याने स्त्रियांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार आणखी मोठ्या प्रमाणावर होईल, अशा प्रकारच्या उपाययोजनांना संमती द्यावी." (फुले समग्र वाङ्मय, पृ. ५१९)

शूद्रातिशूद्रांना शिक्षण मिळावे, विज्ञान मिळावे तसेच स्त्रियांना शिक्षण व विज्ञान मिळावे हे जोतीबांच्या सामाजिक कार्याचे एक अत्यंत कळीचे अंग होते.

खरे म्हणजे शिक्षण हे एकोणिसाव्या शतकाच्या सामाजिक परिसरात एक महत्त्वाचे अंग बनू लागले होते. आधुनिक शिक्षण घ्यायचे, विज्ञान शिकायचे, आधुनिक भांडवली युगाचे तंत्रज्ञान हातात घ्यायचे अशी प्रवृत्ती वाढू लागली होती. वैयक्तिक पातळीवर शिकलेल्या युवकांना नोकरी मिळू शकते तर 'राष्ट्रीय' दृष्टीने नवीन विज्ञान-तंत्रज्ञानाच्या साहाय्याने देशाला ताकद मिळते असा विचार होण्याचा तो काळ होता. याचबरोबर 'स्त्री-शिक्षण' हा समाजसुधारणेच्या चळवळीमधला एक महत्त्वाचा कार्यक्रम झाला. ब्राह्मोसमाज, आर्यसमाज यांपासून ते महाराष्ट्रातील धोंडो केशव कर्वेपर्यंत समाजसुधारकांनी शाळा, शिक्षणसंस्था, कॉलेज सुरू करण्याचा कार्यक्रम घेतला होता.

समाजसुधारणेच्या या सर्व प्रवाहांमध्ये जोतीबांचे वेगळेपण काय होते हे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शूद्र-अतिशूद्र मुलींना शिक्षण देऊ पाहणारे जोतीबा फुले

आणि मध्यमवर्गीय, उच्च जातीय, भद्रलोक या प्रकारच्या थरांतील मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणारे सुधारक यांच्या शिक्षण देण्याविषयीच्या एकूण भूमिकेमध्ये फार मोठा फरक होता.

जुन्या सरंजामी जातीय समाजामध्ये स्त्रिया, शूद्र व अतिशूद्र यांना शिक्षणाचा हक्क नव्हता. अगदी प्राचीन काळात मातृवंशीय किंवा मातृकेंद्रित समाजामध्ये स्त्रियांना महत्त्वाचे स्थान होते. मोहोंजोदारोसारख्या सिंधू संस्कृतीच्या शहरामध्ये स्त्रिया संस्कृतीप्रमुख होत्या, विदूषी होत्या असे उल्लेख आहेत. पण याबाबतचा नेमका इतिहास आज उपलब्ध नाही. नंतरच्या काळात गार्गीसारख्या विदूषी स्त्रियांची उदाहरणे आहेत पण पुढे प्रस्थापित झालेल्या ब्राह्मणी पुरुषप्रधान समाजाला मात्र स्त्रियांचे शिक्षण पटण्यासारखे नव्हते. स्त्रियांना घराशी बांधून ठेवण्याचा व्यवहार सुरू झाल्यानंतर, जातिव्यवस्था सुरू झाल्यानंतर स्त्रियांना मोकळेपणाने शिकण्याचा अधिकार पूर्णपणे बंद झाला. संस्कृत नाटकांमध्ये फक्त 'ब्राह्मण पुरुष' व राजे संस्कृत भाषा बोलतात तर बाकी सर्व शूद्रातिशूद्र पुरुष आणि सर्व थरांतल्या स्त्रिया प्राकृत (बोली भाषा) बोलतात. हे उदाहरण ब्राह्मण-ब्राह्मणेतरांत आणि पुरुष-स्त्रियांत असणारी शिक्षणाची विषमता दाखवणारेच आहे. स्त्रियांचे रोजचे काम म्हणजे 'चूल व मूल' व शूद्रातिशूद्रांतील स्त्रियांचे याशिवाय असलेले शेतीचे किंवा जातीचे इतर काम. त्यांचे धार्मिक काम म्हणजे पातिव्रत्याचे पालन! यासाठी स्त्रियांना शिक्षण देण्याची गरज त्या समाजातल्या ब्राह्मण धुरीणांना वाटत नव्हती.

ब्रिटिश राज्य स्थापन झाल्यावर नवीन 'इंग्रजी शिक्षण' सुरू झाले. या शिक्षणातून उच्च जातीतला नवशिक्षित थर पुढे येऊ लागला. या थरातले पुरुष शिक्षणाच्या संदर्भात नवा विचार करू लागले. नवीन जीवनपद्धत सुरू करायला लागले. त्यांच्या बायका जर न शिकलेल्या व पारंपरिक विचारांच्या असतील तर त्यांच्या जीवनामध्ये अंतर्विरोध निर्माण होऊ लागले. त्यांच्यामध्ये एक प्रकारचा असंतोष तयार होऊ लागला. रवींद्रनाथ टागोरांनी हा असंतोष व्यक्त केला आहे, "आपण जर स्त्री-शिक्षणाचा प्रसार केला नाही तर नवशिक्षित भारतीय समाजामध्ये नवरा-बायकोमधला सुसंवाद नामशेष होईल."

काहींना स्त्रियांच्या दुय्यम स्थानाविषयी, त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराबद्दल राग येऊ लागला. काहींना सतीसारख्या महाभयंकर परंपरांविषयी घृणा वाटू लागली. पण बहुतेक समाजसुधाराकांचा स्त्री-शिक्षणाचा प्रसार करण्यामागचा महत्त्वाचा हेतू एवढाच होता— नवरा-बायकोमध्ये सुसंवाद रहायला पाहिजे. सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ श्रीमती वीणा मुजुमदार या हेतूचे चांगले विश्लेषण करतात :

"शिक्षण स्त्रियांना त्यांच्या कौटुंबिक भूमिका बजावण्यापासून दूर वळविणार

नाही उलट ते बायका आणि आया म्हणून त्यांची कुवत वाढवेल आणि समाजावरील पारंपरिक मूल्यांचा पगडा मजबूत करील. कारण स्त्रिया या मूल्यांच्या इतरांपेक्षा चांगल्या वाहक आहेत.'' स्त्रियांना शिक्षण दिले तर त्या वर्णाश्रमधर्माविरोधी किंवा पातिव्रत्याविरोधी आवाज उठवतील असे या ब्राह्मण-भद्रलोक पुरुषांना अजिबात वाटत नव्हते.

याउलट जोतीबांची शिक्षणविषयक भूमिका अत्यंत वेगळी होती. शिक्षण म्हणजे बहुजन समाजाच्या, स्त्रियांच्या, दलितांच्या मुक्तिलढ्याचे पहिले पाऊल, शिक्षण म्हणजे समाजक्रांतीची तयारी असा त्यांचा दृष्टिकोन होता. कष्टकऱ्यांना शिक्षण मिळाले म्हणजे त्यांना माणूस म्हणून उभे राहण्याचे साधन मिळते; जग, समाज समजण्यासाठी साधने मिळतात; आवाज उठवण्यासाठी, लढा देण्यासाठी हत्यार मिळते अशी त्यांची धारणा होती. फुल्यांच्या ऐतिहासिक विश्लेषणाप्रमाणे हिंसाचाराच्या जोरावर 'आर्य भटांनी' लुटारू समाज सुरू केला होता; ही समाजव्यवस्था स्थिर करण्यासाठी व मूळ बहुजन समाज खाली दाबण्यासाठी खोट्या धर्मग्रंथांतली फसवणूक वापरली होती; शूद्रातिशूद्र समाजाला मुद्दाम अज्ञानात ठेवले होते. त्यामुळे त्यांच्या दृष्टीने शूद्रातिशूद्र व स्त्रियांना मुक्त करणाऱ्या लढ्यातले पहिले पाऊल साहजिकच शिक्षणाचेच होते, त्यांना त्या माध्यमातून जागृत करण्याचे होते. त्यांनी उच्च शिक्षणापेक्षा प्राथमिक शिक्षणावर जास्त जोर दिला आणि हे शिक्षण सर्व मुली-मुलांना मिळाले पाहिजे अशी स्पष्ट भूमिका घेतली. बहुजन समाजात शिकण्याबद्दल ऊर्मी आहे आणि शिक्षण मिळाले तर शूद्र-अतिशूद्र व स्त्रिया अन्यायाविरोधी लढ्यात संघटित होणार अशी त्यांची अपेक्षा होती.

पंडिता रमाबाईंच्या शिक्षण कार्याविषयी जोतीबांनी केलेल्या विश्लेषणात त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट होतो.

''हल्ली इंग्लिश राज्याचे प्रतापाने पंडिता रमाबाईच्या प्रयत्ने करून, कित्येक आर्य ब्राह्मणातील जाड्या जाड्या विद्वानास लज्जा प्राप्त होऊन, त्यांनी आपल्या ऋषिवर्य पूर्वजास दोषमुक्त करण्याकरिता, आपल्या अज्ञानी निर्बल स्त्रियांस आपल्यासारख्या विद्वान करण्याचे कामी सुरुवात केली आहे; परंतु पूर्वी त्यांच्यातील निर्दय आर्य ग्रंथकारांनी स्त्रियांविषयी केलेल्या जुलमी लेखांविषयी आरंभीच आपण वाटावाट करून लिहू गेल्यास त्यापासून अनेक तोटे होतील. ते असे की, आर्य ग्रंथकारांचे पुस्तकातील कृत्रिम लबाड्या भट ब्राह्मणांचे लेकीबाळींच्या लक्षात आल्याबरोबर, त्या एकंदर सर्व देवळातील पुराणिकांची फटफजिती करून त्यांची रेवडी रेवडी करून सोडतील. शिवाय ब्राह्मणांच्या प्रत्येक कुटुंबात सास्वासुनांचे हमेशा वादविवाद होऊन नाना प्रकारचे तंटेबखेडे उपस्थित होऊ लागतील, या

भयास्तव कित्येक भटभिक्षुक आपल्या सुनाबाळांस शाळेत जाण्याचे बंद करून त्यास आपले सत्सार पुस्तक हातीसुद्धा धरू देणार नाहीत.'' (सत्सार - २, फुले समग्र वाङ्मय, पृ. २९५-९६)

'तुम्हाला कुटुंब नष्ट करायचे आहे' हा स्त्री-मुक्तिवाद्यांवरचा एक मोठा आरोप आपल्याला खूप वेळा ऐकायला मिळतो. 'शिकलेल्या स्त्रिया भांडखोर असतात, दुसऱ्यांचे ऐकत नाहीत' असेदेखील काही जुन्या विचारांची मंडळी बोलताना आढळतात. या तऱ्हेच्या मतांबाबतचा जोतीबांचा दृष्टिकोन त्यांनी सत्सार-२ मध्ये मांडलेल्या विचारांतून स्पष्ट होतो. अन्यायाविरोधी लढण्यासाठी, फसव्या परंपरा सोडून देण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे असेच त्यांचे मत होते. त्यांनी केलेल्या पंडिता रमाबाईंच्या स्तुतीमध्ये 'पितृसत्ताक' कुटुंबपद्धती मोडायला पाहिजे ही त्यांची भूमिका स्पष्ट होते. कुटुंबच नष्ट करायचे असा मात्र त्याचा अर्थ नाही. या संदर्भात आपण पुढे चर्चा करणारच आहोत. या ठिकाणी स्त्री-शिक्षणाच्या प्रश्नाबाबत जोतीबांची लढाऊ प्रवृत्ती कशी स्पष्ट दिसते याची नोंद घेणे आवश्यक आहे.

''विद्येवान मति गेली; मतीविना नीती गेली; नीतीविना गति गेली! गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.'' ('शेतकऱ्याचा असूड', फुले समग्र वाङ्मय, पृ. १८९)

जोतीबांच्या ह्या प्रसिद्ध ओळी आहेत. अज्ञान हे गरिबी व शोषणाचे मूळ कारण आहे असा अर्थ यातून पुढे येतो. पण जोतीबा शेवटी या विचाराच्या पुढे गेले असेच दिसून येते. मुलींना, स्त्रियांना शिक्षण दिले तर त्या धार्मिक फसवणुकीविषयी जागृत होणार, गरिबीला शह देण्यासाठी ताकदवान होणार व अन्याय-अत्याचारांविरोधी आवाज उठवणार असे त्यांना वाटत होते. पण शेवटी जेव्हा कुटुंबातल्या व समाजातल्या स्त्रियांच्या गुलामगिरीची तीव्रता त्यांच्या लक्षात आली तेव्हा स्त्रियांचे गुलामगिरीविरुद्ध बंड, स्त्रियांचा मुक्तिलढा असा आपोआप होणार नाही, त्यासाठी खास कार्यक्रम घ्यावे लागणार हे त्यांच्या लक्षात आले. ही जाणीव जोतीबांना कशी आली ते पाहणे महत्त्वाचे आहे.

■

# जोतीबा, सावित्रीबाई व बहुजन समाज कुटुंब

१८८०च्या दशकापर्यंत जोतीबांचे स्त्रियांच्या संदर्भातले काम केवळ शिक्षणाच्या प्रश्नापुरते मर्यादित राहिले. स्त्रियांची गुलामगिरी व शूद्रांचे शोषण यांचा जातिव्यवस्थेशी कसा संबंध आहे हे दाखवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. शूद्रातिशूद्र जनतेचे भटशाही आणि ब्रिटिश नोकरशाही· यांच्यामुळे निर्माण झालेले दारिद्र्य कष्टकरी स्त्रियांना भोगावे लागत होते. त्याचबरोबर त्या पुरुषसत्ता आणि ब्राह्मणी धर्माची फसवणूक यांच्या बळी होत्या. जोतीबांनी स्त्रियांना सगळे समान हक्क मिळाले पाहिजेत असा आग्रह धरला. पण बहुजन-दलित समाजातल्या स्त्रिया व पुरुष यांचे एकाच पद्धतीने शोषण होते असे त्यांचे सुरुवातीचे मत होते. त्यामुळे ज्याप्रमाणे पुरुषांसाठी त्याचप्रमाणे स्त्रियांसाठी 'शिकणे' हा उपाय आहे असे मत त्यांनी मांडले.

१८८० नंतर मात्र या दृष्टिकोनात एक महत्त्वाचा बदल घडलेला दिसतो. कुटुंबात होणारी दडपणूक जशी ब्राह्मण कुटुंबात होते तशीच ती बहुजन-दलित समाजातील कुटुंबांमध्येही होते हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी या दडपणुकीचे वर्णन, विश्लेषण द्यायला सुरुवात केली. स्त्रियांसाठी व पुरुषांसाठी वेगळे नियम लागू आहेत. स्त्रियांनी पतिव्रता म्हणून आयुष्यभर नवऱ्याची सर्व प्रकारची सेवा केली पाहिजे पण नवरा मात्र स्वत:च्या इच्छेप्रमाणे कसाही वागला तरी चालते या प्रकारावर त्यांनी जोरदार हल्ला करायला सुरुवात केली. आज आपण या प्रकारे स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या व्यवस्थेला, स्त्रियांच्या खास शोषणाला कारण असणाऱ्या पद्धतीला 'पितृसत्ताकता' किंवा 'पुरुषप्रधानता' म्हणतो. म्हणजे फक्त शेतकरी-शेतमजूर म्हणून नव्हे, केवळ कामगार किंवा शूद्रातिशूद्र म्हणून नव्हे तर 'स्त्री' म्हणून स्त्रियांचे खास शोषण होते याची नोंद यातून घेतली जाते. 'पितृसत्ताक' शोषणाची जाणीव जोतीबांना झाली आणि ते अशा शोषणाचे वर्णन करून त्यावर हल्ला चढवू लागले. फुल्यांच्या विचारातले हे महत्त्वाचे परिवर्तन होते. त्यांच्या लेखनात आणि समाजकार्यात घडून आलेले हे परिवर्तन केव्हा आणि कसे झाले हे पाहणे या संदर्भात महत्त्वाचे आहे.

आज स्त्री-मुक्तिवाद्यांचे एक महत्त्वाचे म्हणणे आहे : "वैयक्तिक हेसुद्धा राजकीय आहे." वैयक्तिक जीवनात, दैनंदिन कौटुंबिक कारभारात स्त्री-पुरुषांचे जे सर्व संबंध तयार होतात त्यात दडपणूक, प्रभुत्व, संघर्ष, बंड अशी सर्व प्रकारची राजकीय लक्षणे आहेत. सामाजिक पातळीवरील राजकारणाचा एक पाया अशा वैयक्तिक, कौटुंबिक रचनेमध्ये आहे. त्याचबरोबर आपल्या वैयक्तिक, कौटुंबिक अनुभवातून आपली राजकीय, सामाजिक भूमिका मोठ्या प्रमाणात ठरली जाते.

हेच जोतीबांच्या जीवनात झालेले दिसते. १८५० ते १८८० या काळात 'हिंदू कुटुंब संस्था' हा एक मोठा सामाजिक प्रश्न बनला होता. पण या संदर्भातली सगळी चर्चा, वादविवाद ब्राह्मणी कुटुंबापुरते मर्यादित होते. अशा कुटुंबातले विधवांचे स्थान, स्त्रियांचे लग्नाचे वय याभोवती हे वाद चालू होते. ब्राह्मणांमध्ये किंवा ब्राह्मणी धर्माचे नियम लागू होणाऱ्या कुटुंबामध्ये, तथाकथित 'खानदानी' जातींमध्ये नवऱ्याच्या मृत्यूनंतर स्त्रियांचे दुसरे लग्न होण्यावर बंदी होती. स्त्रियांचा दुसरा विवाह होऊ शकत नव्हता. मुलींची लग्ने अगदी लहान वयात (बऱ्याच वेळा वयाने बऱ्याच मोठ्या असलेल्या पुरुषांशी) होत असत. त्यामुळे उच्च जातींमध्ये विधवांचे प्रमाण आणि विशेषत: बालविधवांचे प्रमाण फारच मोठे होते. विधवा म्हणून सासरी राहताना घरातल्या इतर पुरुषांकडून लैंगिक अत्याचार होत होते. त्या काळात ही वस्तुस्थिती फार गंभीर चर्चेचा विषय बनली होती. जोतीबांनी याविषयी फारच कडक भाषेत लिहिले आहे :

"साठसत्तर वर्षांच्या जर्जर झालेल्या बोथऱ्या खल्लड जरठांशी आर्यभट्टांनी पूर्वी लग्न लाविलेल्या स्त्रिया मरताच त्यांनी लावण्यवती अशा अज्ञानी मुलींबरोबर पुन: संबंध करून, त्या अबलांचे तारुण्यात माती कालवितात. परंतु बालपणी वैधव्य आलेल्या अज्ञानी मुलीने मात्र पुन: द्वितीय संबंध करू नये म्हणून कडेकोट प्रतिबंध करून प्रचारात आणिला आहे व याचे परिणाम खाली लिहिल्याप्रमाणे होतात : पतिव्रतेचा पोकळ आव घालणाऱ्या अतिनिर्लज्ज आर्य, आपल्यातील अबला व पंगू भावजया व सुना तारुण्याच्या भरात आल्याबरोबर, त्यांचा रात्रंदिवस पाठलाग इतका करितात की, त्यांची सहजच आडमार्गी पाऊले पडतात. असे झाले म्हणजे त्यास अब्रूकरिता नाइलाज होऊन गर्भपात करून बालहत्या कराव्या लागतात."

अशा कुटुंबपद्धतीला धर्मग्रंथातून मान्यता दिली असल्यामुळे आणि हा व्यवहार उच्च जातींचे लक्षण मानले गेल्यामुळे तो बहुजन समाजातसुद्धा उतरू लागला होता. त्याविषयी फुले म्हणतात :

"आर्य ब्राह्मणांनी ही दुष्ट चाल प्रचारात आणल्यामुळे भोळसर अज्ञानी, कुळवाडी, सोनार वगैरे जातींतील लोकांनी त्यांचा कित्ता घेतल्यामुळे, ते भट्टांप्रमाणेच

आपल्या सुनाबाळांस त्याच प्रकारच्या संकटात पाडतात.'' ('सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक', फुले समग्र वाङ्मय, पृ. ३६१)

या सर्व वर्णनातला प्रमुख भर ब्राह्मणी कुटुंबपद्धतीविरोधी आणि बहुजन समाजावर होत चाललेल्या या पद्धतीच्या प्रभावाविरोधी आहे.

पण प्रश्न इतके सोपे नव्हते. या संदर्भातल्या समस्यांना जोतीबांना स्वत:च्या जीवनात तोंड द्यावे लागले.

सावित्रीबाई जोतीबांची जीवनसाथी होती आणि ती आयुष्यभर त्यांच्या बाजूला उभी राहिली हे सर्वांना माहीत आहे. त्यांना मूल झाले नाही आणि शेवटी त्यांनी एका ब्राह्मण विधवेच्या अनाथ मुलाला दत्तक घेतले. त्यांनी त्याचे नाव यशवंत ठेवले इत्यादी माहिती सर्वज्ञात आहे. या सर्वांचा कुटुंबपद्धतीच्या संदर्भात किती मोठा सहभाग होता हे समजून घेणे फारच महत्त्वाचे आहे.

हिंदू धर्माच्या रूढींच्या दृष्टीने मुलगा हा 'वंशाचा दिवा' समजला गेला आहे. मुलगा असेल तर तोच श्राद्ध वगैरे धार्मिक रूढी-परंपरा वारस म्हणून आचरणात आणू शकतो. ही हिंदू धर्मातली फार मोठी भावना आहे. त्यामुळे एक का होईना 'मुलगा पाहिजे' हा नवरा-बायकोच्या दृष्टीने महत्त्वाचा 'नियम' आहे. ज्या स्त्रीला मुलगा होत नाही त्या स्त्रीला 'किंमत' नाही अशी भावना आहे. अशा स्त्रीला आजही नवरा टाकून देतो किंवा मुलगा होण्यासाठी दुसरे लग्न करतो. त्या काळात तर जोतीबा व सावित्रीबाई यांच्यावर फारच मोठा दबाव आला असेल. सावित्रीबाईंना सोडून देण्यासाठी किंवा दुसरे लग्न करण्यासाठी!

पण जोतीबांनी यातले काहीही केले नाही. दुसरे लग्न केले नाही. रक्ताचा वंश तयार करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी एका विधवेच्या (अर्थातच 'अनैतिक' संबंधातून झालेल्या!) मुलाला त्यांनी दत्तक घेतले. जवळच्या नातेवाईकांपैकी कुणाच्या मुलाला दत्तक घेतले नाही. यामुळे केवळ ब्राह्मण समाजात वादळ झाले असे नाही तर माळी समाजाकडून, नातेवाईकांकडून त्यांचा कडाडून निषेध केला गेला. त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला गेला. जोतीबा आणि सावित्रीबाईंना वडिलांचे घर सोडून वेगळे राहावे लागले.

वैयक्तिक जीवनातली ही फार मोठी घटना होती. तरीही या सगळ्या प्रकरणाविषयी, नातेवाईक किंवा मित्रमंडळींच्या प्रतिक्रियेविषयी जोतीबांनी काहीच लिहिले नाही असे दिसते. खाजगी पत्रांमध्ये असेल तर त्यातले काही आज तरी उपलब्ध नाही. ही 'खाजगी', 'भावनात्मक', 'वैयक्तिक' घटना होती म्हणून त्याची सार्वजनिक चर्चा करू नये असे त्यांना वाटले असेल. पण या सर्व घटनांनी जोतीबांच्या मनावर, विचारावर मोठा परिणाम झाला असावा.

फुल्यांनी १८६५ मध्ये यशवंतला दत्तक घेतले. त्यानंतर बरीच वर्षे ते आपल्या इतर व्यावहारिक चळवळीच्या कामात गुंतलेले राहिले. १८७५ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना झाल्यावर त्यांनी त्याच कामाकडे लक्ष दिले. १८८० नंतरच पुन्हा वेगळ्या तऱ्हेने त्यांनी स्त्री-गुलामगिरीच्या प्रश्नाकडे लक्ष दिलेले दिसते. त्या वेळची परिस्थिती पाहता आपण निश्चितपणे असे म्हणू शकतो की त्या काळात या प्रश्नाच्या संदर्भात आवाज उठवणाऱ्या स्त्रियांच्या कामामुळेच जोतीबांनी स्त्री-गुलामगिरीच्या प्रश्नाकडे नव्या पद्धतीने पाहायला सुरुवात केली.

■

# स्त्री-मुक्तीसाठी पुढे येणाऱ्या त्या काळातील स्त्रिया

"ज्याप्रमाणे आळशासारखं बसून आयतं खाणारांच्या संघटित जुलमांमधून कष्टकरी जन्माला येतात त्याप्रमाणे पुरुषांनी केलेल्या संघटित जुलमांमधून बायका नावाचे प्राणी जन्माला येतात. बायका आणि कष्टकरी जनता यांना पडणारे प्रश्न आजच्या समाजव्यवस्थेत सुटू शकणार नाहीत, हे लक्षात घ्यायला पाहिजे. आहे या परिस्थितीत सुधारणांच्या कितीही तुताऱ्या वाजवल्या गेल्या तरी वरवरच्या उपायांखेरीज काय घडणार? मूळ रोगावर औषधही मूलभूत हवे. कष्टकरी वर्ग, स्त्रिया आणि भूमी कसणाऱ्यांनी पक्के लक्षात ठेवले पाहिजे की त्यांचे स्वातंत्र्य त्यांच्या स्वत:मधूनच उमलून येईल. काही पुरुषांना बायकांच्या परिस्थितीची चांगली जाण असेलही, आणि त्यांच्यामधून बायकांना लढण्यासाठी समर्थ असे सहकारी मिळतीलही. काही कलावंत, कवी, तत्त्वज्ञांमधून कष्टकऱ्यांना सहानुभावाची प्रचिती येईलही. पण पुरुषांकडून बायकांच्या हिताचे काही होईल ही आशा बाळगण्यात अर्थ नाही. कष्टकऱ्यांसाठी 'मध्यमवर्ग' काही भरीव करेल हे मानणे जसे व्यर्थ ठरेल तसेच हे आहे!"

हे सडेतोड म्हणणे मांडले आहे कार्ल मार्क्सची मुलगी एलिनोर मार्क्स आणि तिचा मित्र एडवर्ड एवलिंग यांनी. स्त्रियांची गुलामगिरी कामगारांसारखी आहे. जसे कामगारांचे शोषण भांडवलदारांकडून होते तसे स्त्रियांचे शोषण पुरुषांकडून होते. म्हणून एकंदर पुरुष 'वर्ग' स्त्रियांच्या मुक्तीसाठी फारसे काही करू शकत नाही असा त्यांच्या मांडणीचा अर्थ आहे. स्त्रियांना स्वत:च्या लढ्यातूनच स्वत:ची मुक्ती करून घ्यावी लागते!

हे म्हणणे कितपत खरे आहे? स्त्रियांची गुलामगिरी ही कामगारांच्या शोषणासारखी आहे का? हा एक मोठा विश्लेषणाचा विषय आहे. पण या ठिकाणी या विषयाचा विचार मर्यादित स्वरूपात करायचा आहे. स्त्रियांच्या मुक्तीसाठी पुरुष मोठी कामगिरी करू शकतात असे सांगण्यासाठी भारतातल्या पुरुष समाजसुधारकांची उदाहरणे दिली जातात त्या संदर्भातच या प्रश्नाची चर्चा आपण करणार आहोत.

राम मोहन राय, आगरकर, विरासलिंगम् वगैरे पुरुषांनी स्त्री-शिक्षण, विधवांचे पुनर्विवाह इत्यादी प्रश्नांवर मोठी मोहीम काढली असे सांगितले जाते. याही पुढे जाऊन 'करू पहिलं नमन जोतीबाला, ज्यानं स्त्री-मुक्तीला जन्म दिला' असं गाणं आज स्त्री-मुक्ती चळवळीमध्ये म्हटले जाते!

इतर समाजसुधारकांच्या मर्यादा आपण पाहिल्या आहेत. त्यांच्या तुलनेत जोतीबांचे स्त्रियांच्या मुक्तीच्या संदर्भातले विचार व काम यांचा विचार आपण करीत आहोत. फुल्यांनी शूद्रातिशूद स्त्री-शिक्षणाचे मोठे कार्य सुरू केले एवढेच नाही तर १८८२ नंतरच्या काळात एकूण स्त्रियांच्या गुलामगिरीचे म्हणजेच पितृसत्ताक व्यवस्थेचे वर्णन करायला सुरुवात केली. त्याविरुद्ध कार्यक्रम सुचवायला सुरुवात केली. फुल्यांच्या विचारात घडलेले हे महत्त्वाचे परिवर्तन समजून घेण्यासाठी १८८२ वर्ष का महत्त्वाचे होते ते आधी पाहिले पाहिजे.

१८८२ मध्ये पंडिता रमाबाई पहिल्यांदाच पुण्याला आल्या आणि त्याच वर्षी ताराबाई शिंदे यांची 'स्त्री-पुरुष तुलना' ही पुस्तिका छापून आली.

स्त्री-मुक्तीच्या कामासाठी पुरुष कार्यकर्त्यांनी काही केले नाही असे म्हणणे ही जशी टोकाची व चुकीची भूमिका आहे तशीच स्त्री कार्यकर्त्यांच्या पुढाकाराकडे, कामाकडे दुर्लक्ष करून सर्व श्रेय पुरुष कार्यकर्त्यांना देणे ही दुसरी टोकाची व चुकीची भूमिका आहे. जोतीबा फुले, बाबासाहेब आंबेडकर इतकेच काय भारतातल्या सर्वच पुरुष पुढाऱ्यांच्या संदर्भात विचार करण्याची अशीच चुकीची पद्धत आपल्याकडे रूढ आहे. या थोर नेत्यांच्या हातूनच सर्व झाले अशी समजूत करून घेण्याची ही पद्धत आहे. सामुदायिक उठाव आणि त्या काळातल्या इतर व्यक्तींचे महत्त्वाचे योगदान दुर्लक्षित करणारी ही पद्धत आहे. उदाहरणार्थ, "बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल आणले" असे म्हणताना आपण हे विसरून जातो की अखिल भारतीय महिला काँग्रेसने १९२५ पासून हिंदू पारंपरिक कायद्यात सुधारणा घडवण्यासाठी सतत चळवळ केली होती!

एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारणा चळवळीमध्ये स्त्रियांची भागीदारी किती होती असा प्रश्न सहजच या संदर्भात उभा राहतो. १८८० पर्यंत स्त्रियांची भागीदारी फारशी संघटित किंवा सामुदायिक रीतीने झाली नव्हती. स्त्रिया (विशेषत: उच्च जातीतल्या आणि त्यांपैकी नव्याने इंग्रजी शिक्षित कुटुंबातल्या) इतक्या दडपलेल्या होत्या, त्यांचे शिक्षण इतके कमी होते, त्यांचा सत्ता-संपत्तीतला वाटा शून्यच होता की त्या सामाजिक कामात पुढे येणे जवळ जवळ अशक्य होते. सुरुवातीचे नामवंत सुधारक पुरुषच होते. त्यांच्या जोडीला किंवा त्यांच्या पाठीमागे ज्या स्त्रिया (आई, बायको, वहिनी) होत्या त्या अंधारातच राहिल्या. १८८० नंतर

मात्र ही परिस्थिती बदलू लागली. स्त्रिया स्वत: पुढे येऊन स्वत:चा आवाज उठवू लागल्या, स्वत:च्या संघटना स्थापन करू लागल्या.

ब्राह्मोसमाज ही स्त्रियांच्या प्रश्नाविषयी सर्वात जास्त पुरोगामी भूमिका घेणारी उच्चजातीय संघटना होती. केशवचंद्र सेन यांच्या पुढाकाराने या समाजातील स्त्रियांनी 'ब्राह्मिका समाज' या नावाची एक संघटना १८६५ मध्ये सुरू केली. पण या संघटनेची उद्दिष्टे मर्यादित होती. धर्म, हस्तकला आणि समाजात वावरणाच्या संदर्भातील कौशल्ये स्त्रियांना शिकवण्याचे काम या संघटनेतून चाले. स्त्रियांना पडद्याच्यामागे बसून धार्मिक कार्यक्रमात बसण्याची परवानगी ब्राह्मोसमाजामध्ये होती. १८७८ मध्ये ब्राह्मोसमाजामध्ये फूट झाली, त्या वेळी प्रत्येक गटाने स्वत:ची वेगळी ब्राह्मिका समाज सुरू केली. 'नव विधान' ब्राह्मोसमाजाने 'आर्य नारी समाज' नावाची संघटना सुरू केली तर 'साधारण' ब्राह्मोसमाजाने 'बंग महिला समाज' नावाची संघटना सुरू केली. स्त्रियाच्या संघटनेचे स्वतंत्र अस्तित्व आणि निर्णयप्रक्रिया यात दिसत नाही. पुरुषांच्या निर्णयांचे शेपूट असण्याचीच स्त्रियांची परिस्थिती यातून दिसते.

तरीही संघटित होण्याच्या या पहिल्याच प्रयत्नात स्त्रियांची तळमळ व्यक्त होताना दिसते. त्याचबरोबर त्या काळात उमटलेल्या प्रतिक्रियांवरून सनातनी हिंदू ब्राह्मणांचे प्रतिगामी स्त्रीविरोधी धोरणसुद्धा दिसून येते. कारण ब्राह्मोसमाजाने स्त्रियांना पुढे यायला संधी देण्याचा हा मर्यादित प्रयत्न केला असूनसुद्धा बंगाली उच्च जातीय भद्र लोकांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला होता.

बंगालमधल्या या सुधारणाप्रक्रियेमधून काही स्त्रिया स्वत: पुढे आल्या. देवेंद्रनाथ टागोरांची मुलगी स्वर्णकुमारी देवी यांनी १८८२ मध्ये एक लेडीज 'थिऑसॉफिकल सोसायटी' सुरू केली. १८८६ मध्ये 'सखी समाज' नावाची एक संघटना सुरू केली. त्यांनीच स्त्रियांच्या हक्काची मांडणी करणाऱ्या, राष्ट्रवाद मांडणाऱ्या अनेक कादंबऱ्या लिहिल्या.

पण पहिली स्त्री-मुक्ती संघटना मात्र महाराष्ट्रात सुरू झाली असे दिसते. महाराष्ट्रातले समाजसुधारणा प्रवाह बंगालच्या ब्राह्मोसमाजाप्रमाणे ठोस भूमिका घेणारे नव्हते. त्याचबरोबर स्त्रियांच्या आणि अस्पृश्यांच्या प्रश्नांवर प्रार्थनासमाज वगैरे प्रवाह भूमिका घ्यायला तयार नव्हते. (अगदी १९०८ साली महाराष्ट्रातील ब्राह्मण सुधारकांनी 'राष्ट्रीय सामाजिक परिषद' या संघटनेशी संबंधित 'भारत महिला परिषद' ही संघटना स्थापन केली.) पण काही सुधारक व्यक्ती याच्याही पलीकडे गेल्या होत्या. एक ब्राह्मण पंडित अनंत शास्त्री यांना त्यांनी स्वत:च्या बायकोला संस्कृत शिकवल्यामुळे बहिष्कृत होऊन जंगलात जाऊन राहावे लागले होते. त्यांनी आपल्या

सर्व मुली-मुलांना शिकवले. हेच पुढे प्रसिद्ध झालेल्या पंडिता रमाबाईंचे वडील. त्या काळाच्या भीषण दुष्काळात त्यांचे आई, वडील व एक बहीण वारली. त्यानंतर भटकंती करीत रमाबाई व भाऊ श्रीनिवास कलकत्त्याला गेले. त्या ठिकाणी उत्तम संस्कृत व्याख्यान दिल्यावर रमाबाईंना 'पंडिता' ही पदवी बहाल केली गेली. त्यानंतर रमाबाईंचा भाऊ अकाली वारला. त्यांनी एका 'खालच्या' जातीतल्या वकिलाशी लग्न केले. लग्नानंतर अठरा महिन्यातच त्यांचा नवरा वारला. अशा एकामागून एक आपत्तींमधून रमाबाई गेल्या. नवरा वारल्यावर पारंपरिक रूढीप्रमाणे विधवेचे भयाण आयुष्य जगायला त्यांनी नकार दिला. त्याऐवजी त्यांनी पुढील आयुष्यासाठी एक महत्त्वाचे व्रत स्वीकारले, "जोपर्यंत माझ्या शरीरामध्ये रक्ताचा एक बिंदूमात्र आहे तोपर्यंत आपल्या जातीचे अर्थात स्त्री जातीचे कल्याण व सुधारणा करण्याच्या कामात मी पराङ्मुख होणार नाही. आजपासून स्त्री जातीची सुधारणा करावयाची आहे हे व्रत मी धारण केले आहे."

१८८२ मध्ये पंडिता रमाबाई पुण्याला आल्या आणि महादेव गोविंद रानडे वगैरे समाजसुधारकांचे सहकार्य घेऊन भारताची पहिलीच स्त्री-मुक्ती-संघटना— 'आर्य महिला समाज'— त्यांनी स्थापन केली. ३० नोव्हेंबर १८८२ हा या संघटनेचा स्थापना दिवस.

बालविवाह वगैरे अनिष्ट चालींपासून स्त्रियांची सुटका, जुन्या परंपरेने चालत आलेल्या धर्म व नीती यांच्या कल्पनांमध्ये कालोचित बदल करणे असे या संघटनेचे उद्देश होते. 'प्राचीन भारत' व वैदिक काळाची स्तुती करण्याची आणि त्या विचारसरणीच्या आधारावर तत्कालीन सामाजिक रूढींमध्ये सुधारणा करण्याची ब्राह्मोसमाजाची भूमिका होती. पंडिता रमाबाईंची भूमिका व हेतू यापेक्षा वेगळे होते. प्राचीन भारतातील सामाजिक पद्धती काहीही असोत त्यांची स्तुती करीत बसण्यापेक्षा आजच्या समाजात स्त्रियांना हक्क प्राप्त होणे महत्त्वाचे आहे असे त्यांचे म्हणणे होते. आपल्या कार्यासाठी त्यांनी संपूर्ण मुंबई इलाख्यात दौरा केला आणि खास हिंदू विधवांसाठी आश्रम काढण्याची कल्पना त्यांनी लोकांसमोर मांडली.

पं. रमाबाईंच्या स्त्रियांच्या सुधारणेविषयीच्या कल्पना त्या वेळच्या शिकलेल्या ब्राह्मण समाजाला पटण्यासारख्या नव्हत्या. त्यांच्या दौऱ्याला मिळालेल्या प्रतिसादावरून याची साक्ष पटते. दौरा झाला पण विधवांच्या आश्रमासाठी आर्थिक किंवा अन्य प्रकारची मदत करायला कोणीही पुढे आले नाही! असल्या आगाऊ स्त्रीला कशासाठी मदत करायची? असेच त्या वेळचे शिकलेले (ब्राह्मण) म्हणाले असतील!

या अनुभवामुळे वैतागून पं. रमाबाई इंग्लंडला निघून गेल्या. आयुष्यभर हिंदू समाजाकडून भोगावा लागलेला त्रास आणि त्यातून निर्माण झालेला संताप त्यांच्या

मनामध्ये या काळात उफाळून आला असेल. अशा मन:स्थितीत त्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. यामुळे सगळीकडे टीकेचे वादळ उठले. लोकमान्य टिळकांसारख्या पारंपरिक ब्राह्मण पुढाऱ्यांनी त्यांच्यावर कडाडून हल्ला केला. सुधारक ब्राह्मण पुढारी मूग गिळून गप्प बसले. 'आर्य महिला समाज' संघटना प्रार्थनासमाजाशी संबंधित स्त्रियांनी हातात घेतली. स्त्रियांसाठी हिंदू धार्मिक पूजा-विधी, मुलींची शाळा चालवणे एवढ्यापर्यंत त्यांचे कार्यक्रम मर्यादित राहिले. पं. रमाबाईंनी मात्र पुढे 'शारदा सदन' हा विधवा स्त्रियांसाठी आश्रम सुरू करून आपले व्रत पुढे चालवले.

रमाबाई पुण्याला आल्या तेव्हा त्यांची व जोतीबांची भेट झाली किंवा नाही हे कळायला मार्ग नाही. या विषयीची माहिती उपलब्ध नाही. पण पं. रमाबाईंच्या क्रांतिकारक कार्याविषयी जोतीबा मात्र गप्प राहिले नाहीत हे आपण पाहिले आहे. त्यांनी रमाबाईंना स्त्री-शिक्षणाविषयीचे श्रेय दिले आणि त्यांच्यावर टीका करणाऱ्या ब्राह्मणांवर वैचारिक हल्ला केला. पण प्रश्न एवढ्यावरच संपत नाही.

जेव्हा ब्राह्मणांनी रमाबाईंवर बहिष्कार टाकण्याची भूमिका घेतली तेव्हा बहुजन समाजाच्या सुधारकांनी त्यांना मदत करण्याची भूमिका घेतली की नाही हा खरा प्रश्न आहे. १८८२ मध्ये पं. रमाबाईंनी महाराष्ट्रातील समाजसुधारकांची परीक्षा पाहणारीच पावले उचलली होती. ब्राह्मणी समाजसुधारकांनी आपल्या मर्यादा स्पष्ट केल्या पण सत्यशोधक समाजाच्या वातावरणात असलेल्या स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांनी यापेक्षा काही वेगळे केल्याची माहिती मिळत नाही. जोतीबांनी ठामपणे विचाराच्या पातळीवर रमाबाईंची बाजू घेतली एवढेच या संदर्भात दिसते.

■



124302

## ताराबाई शिंदे : स्त्री-मुक्तीच्या क्रांतिअग्रणी

"तरी मी निरंतर मऱ्हाटमोळ्याचे अटकेतील गृहबंदीशाळेतील मतिहीन अबला असून माझा पहिलाच प्रयत्न असल्यामुळे या निबंधात अतिशय कडक भाषा आहे. पण रोज पुरुषांचे साहस, धाडस व दगलबाजीची नित्य नवी भयंकर उदाहरणे दिसून येत असताही तिकडे कोणीच लक्ष न देता स्त्रियांवरच सर्व दोषांच्या गोणी लादतात; हे पाहून स्त्रीजात्याभिमानाने माझे मन अगदी खळबळून तळतळून गेले..."

अशा भाषेत ताराबाई शिंदेंनी त्यांच्या ऐतिहासिक 'स्त्री-पुरुष तुलना' या पुस्तकाची सुरुवात केली.

या ताराबाई कोण होत्या? फुल्यांच्या लिखाणात आलेल्या माहितीप्रमाणे बुलढाणा जिल्ह्यातील मराठा समाजातील मुलगी. त्यांच्या स्वत:च्या लिखाणावरून त्यांचे कुटुंब 'शहाण्णव कुळी', 'खानदानी' व स्त्रियांना गोषात ठेवणारे होते. त्यांचे वडील बापूजी हरी शिंदे हे सत्यशोधक समाजाचे सभासद होते. 'बालविवाह' आणि 'सक्तीचे वैधव्य' या प्रश्नांवर लिहिताना त्यांनी १८८४ मध्ये अशी भूमिका मांडली आहे की बालविवाह हा गुन्हा ठरवून त्यावर कायद्याने बंदी आणावी आणि विधवांना पुनर्विवाहाची सवलत असावी. सत्यशोधक समाजाच्या नियमाप्रमो बापूजी शिंदेंनी त्यांच्या मुलीला शिक्षण दिले होते. त्यांना मराठी, इंग्रजी, संस्कृत शिकवले. पण, पण या मुलीचे वेगळ्या प्रकारे लग्न करावे किंवा तिला जीवनाच्या वेगळ्या वाटेवर पाठवावे हे त्यांच्या ध्यानात आले नव्हते. त्यामुळे स्त्रीवादी संशोधक विद्युत भागवत टीका करतात, "एकीकडे नव्या विचाराच्या प्रभावामुळे आपल्या मुलीला स्वतंत्र विचार करायला वाव द्यायचा व दुसरीकडे आपल्या हाताने तिला रीतिरिवाजांच्या चौकटीत बंदिस्त करून टाकायचे असा काहीसा दुटप्पी व्यवहार शिंद्यांच्या खाजगी आयुष्यात घडला होता."

यामुळे ताराबाईंना क्रांतिकारक विचारांचे बाळकडू आणि ब्राह्मणी धर्माने लादलेल्या स्त्रीजीवनाची वास्तविकता या दोन्हींचा अनुभव मिळाला! या अनुभवाला नवीन आशा-आकांक्षांच्या प्रकाशात ठेवून त्यांनी असा निष्कर्ष काढला :

"स्त्री धर्म म्हणजे काय? निरंतर पतीची आज्ञा पाळणे, त्याचे मर्जीप्रमाणे वागणे, त्यानी लाथा मारिल्या, शिव्या दिल्या, दुसऱ्या रांडा ठेवल्या; नवरूजी दारू पिऊन, फितूर चहाडी, खजिना लुटून, लाच खाऊन जरी घरी आले तरी स्त्रीने आपले हे कोणी जसे काही कृष्ण महाराजच गौळयांचे घरी दूध चोरून चंद्रीवलीला कलंक लावून आलेत असे समजून परमात्म्यासारखीच याची मोठ्या हसतमुखाने देवासारखी पूजा करावी... पातिव्रत्य मोडण्याला लक्षावधी कारणे आहेत."

'स्त्रीजातीविषयी अभिमान' आणि 'स्त्रीधर्म' किंवा 'पातिव्रत्य' या मुळात अन्याय करणाऱ्या सामाजिक रचना आहेत, ही समज या ताराबाईंच्या विचाराच्या मुख्य दिशा होत्या. भारताच्या प्राचीन काळाची स्तुती करण्यापेक्षा वैदिक काळ हा आदर्श म्हणून स्त्रियांनी समोर ठेवण्यापेक्षा ताराबाईंनी अत्यंत धारदार शब्दांत पुराणकथांच्या स्त्रीविरोधी भूमिकांचा समाचार घेतला.

"आता द्रौपदी पाच नवऱ्यांची बायको असूनही कर्ण महाराजांचे अंतर्यामी चिंतन करत होती का नाही? अहिल्या सुरेंद्रच्या आंकारूढ होऊन शिळा होऊन पडली. सत्यवती, कुंती असे दोन पुत्री प्रसवल्या तरी पटातच नाव! एकीने पराशर ऋषीपासून अंगाची दुर्गंधी घालवण्याकरिता ऋषी वचन मान्य केले, एकीने मंत्र प्रचिती पाहिली वारे देव! वारे ऋषी!"

अशा पद्धतीने ताराबाईंनी टीका केली. पारंपरिक पुरुषांच्या धर्मामध्ये व स्त्रियांनी पाळावयाच्या धर्मामध्ये असलेली विसंगती त्यांनी विदारकपणे पुढे आणली. ब्रिटिश राज्यात स्त्रियांविषयी सुधारणेचे बारीक जरी पाऊल पडले तरी ब्राह्मणी पुरुष पुढाऱ्यांचा आरडाओरडा सुरू होई. विवाहाचे वय, सती यांसारख्या प्रश्नांबाबत असा आरडाओरडा झाला होता. आजही उत्तरेत पुन्हा एकदा सती प्रथेला उचलून धरण्याचा प्रयत्न झाला. मुस्लीम स्त्रियांच्या 'तलाक' प्रश्नावर मुस्लीम पुरुष आपल्या पुरुषी श्रेष्ठत्वाचे रक्षण करण्यासाठी धर्माच्या नावावर उभे राहिले. या संदर्भात ताराबाईंनी त्या काळातल्या अशा पुरुषांचा उपरोधी भाषेत चांगलाच समाचार घेतला आहे. त्यांनी प्रश्न विचारले की, 'तुम्ही ब्रिटिशांची भाषा, पोशाख इत्यादी सगळे वापरता, घर वगैरे ब्रिटिशांसारखे ठेवता मग तुम्ही कोणत्या संस्कृतीचे रक्षण करता?' त्यांनी 'स्त्री-धर्म', 'पातिव्रत्य' या शब्दांपाठीमागची मानभावी प्रवृत्ती उघडी पाडली. एवढेच नव्हे तर धर्मकथांमध्ये मांडलेले आदर्श कसे स्त्री-विरोधी आहेत हेसुद्धा दाखवून दिले.

"या स्त्री जातीतील सावित्री तर आपल्या पतीचा प्राण परत आणण्याकरिता यमदरबारात जाऊन आली. पण पुरुषांमध्ये कोणी तरी आपले बायकोचे प्राणाकरिता यमराजाचे दरबारात तर नाहीच, पण उगीच त्या दरबाराचे वाटेवर तरी गेलेला कोठे ऐकण्यात आला आहे काय? तर जसे एकदा सौभाग्य गेले म्हणजे स्त्रियांनी आपली

तोंडे अगदी एखाद्या अपराध्याप्रमाणे काळी करून सर्व आयुष्यभर अंधारकोठडीत राहावे, त्याप्रमाणे तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्हीही आपली तोंडे काळी करून, दाढ्यामिशा भादरून यावतजन्मपर्यंत कोठेही अरण्यवासात का राहू नये बरे? एक बायको मेली की तिचे दहावे दिवशीच तुम्ही दुसरी करून आणावी असा तुम्हाला कोणत्या शहाण्या देवाने दाखला दिला आहे, तो दाखवा बरे! जशी स्त्री तसेच पुरुष.''

ताराबाईंचे पुस्तक म्हणजे युक्तिवादावर आधारित विश्लेषण असण्यापेक्षा संतापातून जन्मलेली गर्जना आहे. पण त्याच वेळी त्यांनी मांडलेले विचार नेमके आणि धारदार आहेत. राष्ट्रवादी, स्वयंघोषित समाजसुधारक, धर्मग्रंथ, कुटुंबपद्धती या सर्वांमधल्या पुरुषी वर्चस्ववादावर त्यांनी समग्र टीका केली आहे. त्यांच्या लिखाणातून अप्रत्यक्ष रीतीने का होईना सत्यशोधक समाजावर टीका केली गेली आहे. स्त्री-मुक्तीच्या मागणीला वगळून केलेल्या मुक्तीच्या मागणीवर असलेली ही टीका आहे.

ताराबाईंनी केलेल्या कठोर टीकेमुळे सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनीसुद्धा त्यांना विरोध केलेला दिसतो. या संदर्भातील नेमकी माहिती (इतिहास) अजून पुढे आलेली नाही. फुल्यांचा इतिहास लिहिणाऱ्या लेखकांनी किंवा संशोधकांनी सत्यशोधक समाजातल्या काही वादविवादांवर प्रथम प्रकाश टाकला आहे. पण स्त्रियांच्या संदर्भात सत्यशोधकांमध्ये असलेल्या मतभेदांविषयी फारसे काही उजेडात आलेले नाही. १८७६ पासून पुण्याच्या सत्यशोधक समाजात फुले आणि तरुण कार्यकर्ते कृष्णराव भालेकर यांच्यात वाद होते असे दिसते. भालेकर ताराबाईंवर टीका करणाऱ्यांपैकी एक असल्यामुळेसुद्धा हा वाद वाढला असावा. कारण जोतीबा त्यांच्या नेहमीच्या न्याय स्वभावामुळे ताराबाईंचे समर्थन करायला पुढे आले. 'सत्सार-२' या पुस्तकात त्यांनी पं. रमाबाई आणि ताराबाई यांच्यावर टीका करणाऱ्यांचा समाचार घेतला आहे.

''अरे बाळा, (यशवंतला उद्देशून) पंडिताबाई पुण्यात येण्याचे पूर्वी सौ. ताराबाई शिंदे, मुक्काम बुलढाणे, प्रांत वऱ्हाड यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' या नावाच्या पुस्तकात बहुतेक भर्ते आपल्या स्त्रियांसमक्ष पाहिजेल त्या चावचेष्टा करून नीच कर्मे आचारू लागल्यामुळे, कित्येक कुलीन पतिव्रता स्त्रियांस अत्यंत विषम वाटून, त्या अज्ञानी व निर्मळ असल्यामुळे अमर्याद कोपाते पावून, त्यांचे मनात दुष्कर्मरूपी समुद्राच्या अतिभयंकर लाटा उद्भवतात, त्याचे निवारण व्हावे याप्रीत्यर्थ त्यांनी पुरुष मंडळास अतिउत्तम बोध केला, तो 'जिस, तन लागे वही तन जाने. बिज्या क्या जाने गव्हारा रे' या प्रसिद्ध कवनाप्रमाणे थोडासा तिखट खरमरीत आहे खरा, परंतु तो बोध एका आडमूठ वर्तमानपत्रकर्त्यास रुचला नाही. सबब, अथवा सौ. ताराबाईंचे पुस्तक खंडन

करू लागल्याने, उलट आपल्याच गळ्यात त्यातील सर्व दोषांचे घोंगडे पडेल, या भयास्तव राजश्रीनी त्या पुस्तकातील एकंदर सर्व बोधाचा धि:कार करून त्यास कचऱ्याचे पेटीत झोकून आपले नाक मुठीत धरून उलटी ताराबाईंचीच निंदा करून तिचे उपकार फेडले.'' (फुले समग्र वाङ्मय, पृ. २९७)

'स्त्रियांचे प्रश्न पुढे आणले तर फूट होणार' असा युक्तिवाद पितृसत्तेचे, पुरुषप्रधानतेचे समर्थन करणारी मंडळी सततच करत आली आहेत. 'राष्ट्रीय चळवळीत फूट पडणार', 'कामगार चळवळीत फूट पाडणार', 'दलित चळवळीत फूट पाडणार' इत्यादी विधाने या संदर्भात केली जातात. एका अर्थाने हे म्हणणे मर्यादित स्वरूपात खरे आहे. पण अधिक मुक्त मानवी संबंधांकडे जाण्यासाठी, त्या पायावर नवी एकजूट बांधण्यासाठी ही फूट आवश्यकच आहे. याचा विचार ही मंडळी करत नाहीत. आणि फुल्यांनी वापरलेल्या, 'जिस तन लागे वही तन जाने. बिज्या क्या जाने गव्हारा रे' या म्हणीप्रमाणे ज्या समाजविभागाला दाबले गेलेले असते, गुलामीत ठेवलेले असते तो स्वत:च मुक्तीसाठी धडपड करू लागतो. फूट असतेच, ती कोणी पाडावी लागत नाही. दाबला गेलेला समाजविभाग जेव्हा मुक्तीसाठी धडपडू लागतो तेव्हा ही फूट उघड होते एवढेच.

त्याचप्रमाणे ताराबाई शिंदेंनी जेव्हा त्यांचे 'स्त्री-पुरुष तुलना' हे पुस्तक समाजापुढे ठामपणे उभे केले तेव्हा शूद्रातिशूद्रांच्या मुक्तीसाठी बोलणाऱ्यांनासुद्धा ही फूट जाणवली. त्यांनी मतभेद व्यक्त करायला, नाराजी दाखवायला सुरुवात केली. अशा वेळी जोतीबा फुले मात्र ताराबाईंच्या बाजूने उभे राहिले. ताराबाईंनी मांडलेले पितृसत्ताकतेचे वर्णन, त्या विरुद्ध मांडलेले विचार यांचा जोतीबांच्या मतांवर किती परिणाम झाला होता हे त्यांच्या नंतरच्या लिखाणावरून दिसून येते.

ताराबाईंचा पुढचा इतिहास आपल्याला माहीत नाही. त्यांनी पंडिता रमाबाईसारखी प्रसिद्धीही मिळाली नाही. त्याच्याविषयीची माहिती अजून अंधारातच आहे. त्यांच्याच शब्दांत मांडायचे तर त्यांना 'गृहबंदीशाळेत' जास्तच डांबून ठेवले गेले की काय अशीच शंका येते.

पण ताराबाईंची पुरुषप्रधान समाजाविषयीची भूमिका, त्यांचे भावनापूर्ण लेखन, कठोर शब्द पुढच्या काळात जोतीबा फुल्यांनी मांडलेल्या विचारातून जिवंत राहिलेले दिसतात.

■

# पितृसत्ताकतेच्या शोधात जोतीबा

'सत्सार-२'मध्ये फुल्यांनी पं. रमाबाई आणि ताराबाई शिंदे याचे समर्थन केले. एवढेच नव्हे तर त्या संदर्भात त्यांनी स्त्री गुलामगिरीच्या मूळ स्वरूपाकडे लक्ष द्यायला सुरुवात केली.

सुरुवातीच्या काळात त्यांनी भटशाहीकडून होणाऱ्या शूद्रातिशूद्रांच्या शोषणाबरोबर स्त्रियांच्या वेगळ्या शोषणाची दखल घेतली होती. शूद्रातिशूद्र मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलींच्या शिक्षणाचा आग्रह धरला होता. विधवांना आश्रय देऊन त्यांच्या अनाथ मुलांचे संगोपन करण्याचा प्रयत्न केला होता, पण त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या दशकात त्याच्याही पलीकडे जाऊन या समाजातील स्त्री-पुरुष संबंधात स्त्रियांवर कसा अन्याय होतो हे मांडायला सुरुवात केली. हे संबंध म्हणजे स्त्रियांना गुलाम ठेवणारी व्यवस्था आहे असे विचार त्यांच्या लिखाणातून पुढे येऊ लागले.

आजच्या स्त्री-मुक्तिवादी भाषेत बोलायचे तर 'पितृसत्ताकता' किंवा 'पुरुषप्रधानता' हे एकंदर शोषणाच्या, दडपणुकीच्या व लुटीच्या व्यवस्थेचे एक अत्यंत महत्त्वाचे अंग आहे, असे मांडायला जोतीबांनी सुरुवात केली.

'सत्सार-२'मध्ये किंवा त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालेल्या 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' या पुस्तकात जोतीबांनी स्त्री-पुरुष असमानता व स्त्रियांचे कुटुंबातील दुय्यम स्थान यांवर भर दिला आहे. स्त्रियांवर पातिव्रत्याचे बंधन आहे पण तसे बंधन पुरुषांवर मात्र नाही. पुरुषांना कितीही लग्ने करायला परवानगी. पण स्त्रियांना मात्र नाही. (आज परित्यक्तांचा तीव्र झालेला प्रश्न म्हणजे याचाच परिपाक आहे.) या विरोधाभासांना जोतीबांनी आपल्या लिखाणात उघडे पाडले आहे.

"...स्त्रियांपेक्षा पुरुषच अधिक पक्षपाती, दगेबाज, ठक, साहसी, क्रूर व नित्य नवीन ज्यास्ती भयंकर, धाडसी दुष्टकर्मे आचरणारे आहेत, म्हणून तुझीसुद्धा खात्री होईल... प्रथम मूळ लग्नाची पहिली स्त्री दादलोजीसी आवडेनाशी झाली, म्हणजे त्याने दुसरी ज्वान पठ्ठी स्त्री तिचे उरावर करावी, पुढे सदरप्रमाणे दोघींच्या उरावर तिसरी आणि तिघींच्या उरावर आणखी चौथी स्त्री करून अखेरीस तिचा चोंबडा चाकर

बनून रात्रंदिवस तिचे भोवताली गोंडा घोळून मौजा मारितो; परंतु स्त्रीचे लग्न होताच तिचा नवरा दुर्वर्तनी निपजल्यासदेखील तिने याचे उरावर दुसरा नवरा करून त्याच घरात रात्रंदिवस संसार प्रपंच करून राहवे, म्हणून आर्य पुरुषांनी केलेल्या ग्रंथात कुठे लेख सापडत नाही. मग एरवीची गोष्ट कशाला? यावरून स्त्रिया किंवा पुरुष याचपैकी कोण ज्यास्ती पक्षपाती, ज्यास्त दगेबाजे व ज्यास्ती कृत्रिमी आहे? अरे बाळा, या पक्षपाती आर्य ग्रंथकारांचे घ्यावयाचे माप एक व द्यावयाचे माप एक.'' (फुले समग्र वाङ्मय, पृ. २९९)

याचप्रमाणे एक मुद्दा 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' या लिखाणात येतो, ''जोतीराव उ. : काही लोभी पुरुष आपल्यास जास्त सुख व्हावे अथवा आपल्या मन:कामना जास्ती पूर्ण व्हाव्या यासाठी एका घरात दोन-दोन तीन-तीन लग्नाच्या बायका करून नांदतात व त्याविषयी आपण, काही हेकड पुरुषांनी केलेल्या धर्मग्रंथांचा आधारही दाखवितात. त्याचप्रमाणे जर काही स्त्रियांनी आपल्या मन:कामना तृप्त करण्याकरिता दोन-दोन, तीन-तीन लग्नाचे नवरे करून एक घरात नांदू लागल्यास आपणा सर्व पुरुषांस या विषयी काही विधीनिषेध वाटणार नाही काय?''

मानाजी प्र. : स्त्रियांनी तसे जगाविरुद्ध घाणेरडे वर्तन केल्यास त्यास फार अघोर प्रायश्चित्त दिले पाहिजे.

जोतीराव उ.: तुम्हास जर स्त्रियांचे तसे आचारण आवडणार नाही, तर आपणा सर्व पुरुषांचे त्याच मासल्याचे आचारण स्त्रियांस तरी कसे आवडेल? कारण स्त्री आणि पुरुष एकसारखे एकंदर सर्व मानवी अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र असता स्त्रियांस एक तऱ्हेचा नियम लागू करणे व लोभी व धाडसी पुरुषांस दुसरा नियम लागू करणे हा निवळ पक्षपात होय.'' (फुले समग्र वाङ्मय, पृ. ३६२)

अशा उत्तरामध्ये ताराबाई शिंदेंच्या दृष्टिकोनाची छाप दिसते. या ठिकाणी 'आर्यभट्टांनी' लिहिलेले धर्मग्रंथ याऐवजी 'हेकड पुरुषांनी' केलेले धर्मग्रंथ असा उल्लेख आला आहे. धर्मग्रंथामध्ये केवळ 'आर्यभट्ट ब्राह्मणांचे' वर्चस्व व्यक्त होते असे नाही. एकंदर पुरुषांचे स्त्रियांवरचे वर्चस्व व्यक्त होते हे जोतीबांच्या स्पष्टपणे लक्षात आलेले आहे. ताराबाईंनी उभे केलेले प्रश्न फुल्यांनी उचलून धरले आहेत. उदाहरणार्थ, ताराबाईंनी विचारले आहे :

''पुरुषामध्ये कोणीतरी आपले बायकोचे प्राणाकरिता यमराजाचे दरबारात तर नाहीच, पण उगीच त्या दरबाराचे वाटेवर तरी गेलेला कोठे ऐकण्यास आला आहे काय?''

याच पद्धतीने जोतीबांनी सवाल केला आहे,

''... कित्येक सती देखील जात असत. परंतु पुरुषाला तिच्याविषयी दुःख होऊन

तो कधी "सता" गेलेला ऐकला आहे काय?" (फुले समग्र वाङ्मय, पृ. ३५९)

पुरुषांचा अन्याय सहन करीतच स्त्रिया मुलांच्या संगोपनाची इत्यादी महत्त्वाची कामे कशी करतात याचे वर्णन जोतीबांनी केले आहे,

"... तीच आपल्या सर्वास जन्म देणारी होय. आपले मलमूत्रादि काढून आपल्या सर्वांचे लालन पालन करून आपल्या सर्वांचा परामर्थ करणारी होय. आपण सर्व पंगू लाचार असता सर्वकाळ आपली काळजी वाहते व तिनेच आपणा सर्वास चालावयास व बोलावयास शिकविले, यावरून एकंदर अबालवृद्धात जगप्रसिद्ध म्हण पडली आहे की, "सर्वांचे उपकार फिटतील परंतु आपल्या जन्मदात्या मातोश्रीचे उपकार फिटणार नाहीत." यास्तव नि:संशय पुरुषापेक्षा स्त्री माझ्या मते श्रेष्ठ आहे." (फुले समग्र वाङ्मय, पृ. ३५९)

अशा प्रकारे जोतीबांनी स्त्रियांच्या दडपणुकीचे किंवा 'पितृसत्ताकतेचे' वर्णन केले आहे. त्यांच्या समाजामध्ये आज आपल्याला अनेक उणिवा किंवा दोष वाटतील. उदाहरणार्थ, ज्याला आज आपण 'सामाजिक लैंगिक श्रमविभागणी' म्हणतो त्याविषयी त्यांनी काही मांडणी केलेली नाही. किंवा स्त्रियांच्या गुलामगिरीचा उदय व इतिहास त्यांच्या लिखाणात फारच त्रोटक स्वरूपात आला आहे. स्त्रियांच्या दडपणुकीच्या स्वरूपात का व कसे बदल होत गेले याची मांडणी केलेली नाही. अर्थात, शेतकऱ्यांची लूट होत जाण्याच्या इतिहासामध्ये स्त्रिया जास्त प्रमाणात लुटीच्या बळी झाल्या आहेत. 'स्त्रिया लुटारू किंवा चोर नसतात', 'लुटणाऱ्यांना व दुसऱ्यांवर गुलामी लादणाऱ्यांना आधार देणारे ग्रंथ पुरुषांनी लिहिले आहेत', 'स्त्रियांनी फसवणुकीचे काम कलेले नाही' अशा अर्थाची मांडणी मात्र जोतीबांनी ठामपणे केली आहे. पण मानवी समाजाच्या बदलत गेलेल्या उत्पादनप्रक्रियांचे व उत्पादनसंबंधांचे स्त्रियांची दडपणूक चालू राहण्यावर किंवा तिचे स्वरूप बदलत जाण्यावर कसे परिणाम झाले याचे विश्लेषण त्यांनी दिलेले नाही.

अर्थात त्या वेळी झालेले महत्त्वाचे ऐतिहासिक संशोधन किंवा मानववंशशास्त्राने प्रकाशात आणलेली वस्तुस्थिती मार्क्स किंवा एंगल्सप्रमाणे जोतीबांना उपलब्ध नव्हती. कारण जोतीबा एका मागासलेल्या, ब्रिटिश भांडवलदारांनी गुलाम केलेल्या भारतीय समाजात राहत होते, तिथेच जन्माला येऊन वाढलेले होते. फुल्यांचे विश्लेषण पुढे न जाण्याचे ते एक महत्त्वाचे कारण होते.

'पुरुषांपेक्षा स्त्री श्रेष्ठ आहे' हे 'अतिस्त्रीवादाशी' जुळणारे विचार जोतीबांनी 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' या लिखाणात जोरदारपणे मांडले पण ही श्रेष्ठता नैसर्गिक आहे की सामाजिक याविषयी भूमिका मांडली नाही. पण या संदर्भात एक अध्याहृत भूमिका त्यांच्या मांडणीमध्ये आहे. "स्त्रिया पुरुषांवर जास्त प्रीती करतात",

पुरुष स्त्रियांवर कमी प्रीती करतात "प्रेमळ" स्त्रीच्या तुलनेत "धाडशी" पुरुष असे चित्र जोतीबा आपल्या समोर उभे करतात. "अशा तऱ्हेने पुरुषामध्ये अन्यायी प्रवृत्ती का तयार होतात?" या प्रश्नाला ते उत्तर देतात, "स्त्रिया फार अबला असल्यामुळे!" यावरून स्त्रियांच्या काही नैसर्गिक कमकुवतपणामुळे त्या पुरुषांच्या अन्यायाला बळी पडतात असा अर्थ निघू शकतो. पण एवढ्यावर न थांबता ते त्याबद्दल महत्त्वाचे सामाजिक स्पष्टीकरण देतात :

"त्यांस मानवी हक्क समजू देऊ नये, या इराद्याने त्यांस विद्या शिकविण्याचा प्रतिबंध केला, यामुळे एकंदर सर्व स्त्रियांवर अशा तऱ्हेचे जुलमी प्रसंग येऊन गुदरला." (फुले समग्र वाङ्मय, पृ. ३५९)

म्हणजे शेवटी स्त्रियांची गुलामगिरी सामाजिक कारणामुळे होती असा निष्कर्ष जोतीबांनी काढला आहे. पण त्यांचा मुख्य भर ज्ञान मिळणे-न मिळणे यावर आहे.

सारांश, जोतीबांनी स्त्री-मुक्तीची स्पष्ट भूमिका घेतली होती, ती केवळ स्त्रियांचा 'उद्धार' व्हावा किंवा 'स्त्रिया सुशिक्षित झाल्यास कुटुंबाला पुढे जायला बरे होईल' या पातळीवरची नव्हती. एकंदर पुरुषांकडून एकंदर स्त्रियांवर गुलामगिरी लादली गेली आहे आणि ती नष्ट होणे आवश्यक आहे अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती. या प्रक्रियेत त्यांनी 'पितृसत्ताक' कुटुंबपद्धतीवर घणाघाती हल्ला केला आहे.

■

# कुटुंबसंस्थेची पुनर्रचना

सुरुवातीला जेव्हा जोतीबांनी स्त्रियांना शिक्षण देण्याविषयी विचार मांडले व त्यासाठी ठोस प्रयत्न केले तेव्हा त्यांच्या विचाराप्रमाणे हा कार्यक्रम जातिव्यवस्थाविरोधी मुक्तिलढ्याचा भाग होता, पण पुढे पं. रमाबाईंची स्तुती करताना स्त्रियांनी शिक्षण घेतल्यावर होणाऱ्या परिणामांना 'भटभिक्षुक' का घाबरतात याचे जे स्पष्टीकरण दिले आहे त्यातून पुरुषी दादागिरी नष्ट होण्याची भीती हे महत्त्वाचे कारण दिले आहे. शिकलेल्या ब्राह्मण स्त्रिया 'आर्य' ग्रंथकारांनी स्त्रियांविषयी लिहिलेल्या 'जुलमी' लेखांबाबत त्यांना जाब विचारतील असे त्यांनी म्हटले आहे.

मग जोतीबांच्या असे लक्षात आले की, पुरुषी दादागिरी फक्त ब्राह्मणांच्या कुटुंबात नव्हती. बहुजन समाजाच्या कुटुंबातसुद्धा स्त्रियांवर सर्व प्रकारची अरेरावी, दादागिरी होते आणि मारहाणसुद्धा केली जाते. यावरून त्यांनी विचार केला असावा की स्त्रियांना गुलाम ठेवणारी व्यवस्था सर्व समाजांत, सर्व जातींमध्ये होती मग ताराबाई शिंदेंसारख्या स्त्रिया बंडखोर का होणार नाहीत? अर्थात यामुळे स्त्रियांना सार्वत्रिकपणे शिक्षण देण्याचा फुल्यांचा आग्रह कमी झाला नाहीच. त्यांनी याहीपुढे जाऊन कुटुंबसंस्थेत सुधारणा घडवून आणण्याच्या प्रश्नामध्ये जागृतपणे लक्ष घालायला सुरुवात केली.

भारतीय कुटुंबसंस्था जशी जातिव्यवस्थेवर आधारलेली आहे तशीच ती पितृसत्ताकतेच्या आधारावरही उभी आहे. जातिव्यवस्था टिकवण्यासाठी 'रोटी-बेटी व्यवहार' जातिअंर्तगत ठेवणे याचा अर्थ असा होतो की मुलींना जास्तीतजास्त प्रकारे 'बांधून' ठेवले पाहिजे. त्यामुळे त्यांना बाहेर जाऊन, मोकळेपणाने हिंडून वेगवेगळ्या जातिधर्माच्या मुलांमध्ये मिसळण्यावर बंदी आणणे हे ओघानेच आले. अशा बंदीवर कुटुंबसंस्था आधारलेली होती. आई-वडिलांनी लग्न ठरवायचे, मुली-मुलांच्या इच्छेचा विचार करायचा नाही अशी पद्धत अगदी आजतागायत चालू आहे. यात मुलगे आणि मुली आपापले जीवनसाथी निवडणार, स्वतंत्र व्यक्ती म्हणून एकमेकांबरोबर राहणार, कामे करणार याऐवजी त्यांची कुटुंबे कोणत्या जातीतील

आहेत, त्यांची ‘खानदानी’ जुळते की नाही हा निकष लग्न ठरवण्यातला मुख्य निकष बनतो. जोतीबांच्या काळात तर मुलींची लग्ने अगदी लहान वयात होत असत. ही लहान वयातील मुलगी लग्न झाल्यावर सासरी ‘नांदायला’ जात असे; तिथे वेठबिगारासारखी राबत असे; नवरा, दीर, सासू, सासरा यांची सेवा करत असे; सगळ्यांची दादागिरी सहन करून वर नवऱ्याने दुसरी बायको केली तर ‘तिच्याबरोबर’ राहण्याचा प्रसंग ओढवे किंवा सासरहून हाकलून काढले जाऊन माहेरी परत येण्याची पाळी येई. आजही यांपैकी बहुसंख्य व्यवहार याच प्रकारे चालू आहेत. या सर्वाला केवळ मनुस्मृतीच नव्हे तर इतर अनेक ब्राह्मणी धर्मग्रंथांचा आधार दिला गेला आहे. “लहानपणी वडिलांच्या ताब्यात, त्यानंतर नवऱ्याच्या ताब्यात, म्हातारपणी मुलग्याच्या ताब्यात (अर्थात) स्त्रियांना स्वातंत्र्याचा अधिकार असणार नाही!” हे प्रत्यक्ष सामाजिक व्यवहाराचे वर्णनच तत्त्व म्हणून ‘मनुस्मृती’मध्ये मांडले गेले आहे.

स्त्रियांच्या गुलामगिरीची सुरुवात कशी झाली याविषयी त्या काळात उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारावर एंगल्सने आपले विश्लेषण मांडले आहे. फुल्यांच्या काळातच युरोपियन वातावरणात वाढलेल्या एंगल्सने ही मांडणी केली. त्याच्या मते, खाजगी मालमत्ता प्रस्थापित झाल्यावर त्या मालमत्तेचा उत्तराधिकारी आपलाच वारस आहे याची हमी तयार करण्याकरता पुरुषांनी मातृवंशीय पद्धती आणि स्त्रियांच्या अधिकारांचा उच्छेद केला. स्त्रियांना अशा प्रकारे ‘गुलाम’ करून त्यांचा ‘जागतिक-ऐतिहासिक’ पराभव केला.

फुल्यांचे विश्लेषण यापेक्षा वेगळे होते. त्यांचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा होता. शेतकऱ्यांच्या लुटीच्या प्रक्रियेमध्ये त्यांच्या दृष्टीने जमिनीच्या मालकी हक्काच्या प्रस्थापनेपेक्षा ‘लुटारू’, ‘धाडसी’ पुरुषांनी केलेल्या स्वाऱ्या, आक्रमणे व हिंसाचार यांची भूमिका प्रमुख होती. या प्रक्रियेमधून प्रस्थापित झालेली नवीन भटशाही देव, धर्म, धर्मग्रंथ, पुराणकथा यांचा आधार घेऊन इतर सर्व ‘खालच्या’ जातींना मुद्दाम अज्ञानाच्या अंधारात ठेवून आपली दादागिरी चालवीत होती, असे त्यांचे मत होते. त्यामुळे त्यांनी ‘आर्यभट्टांनी कपटाने केलेल्या लोककल्याणकारी बळीराजाच्या पराभवाला केंद्र करून शूद्रअतिशूद्र कष्टकरी जनतेसाठी नवीन ऐतिहासिक विचारसरणी मांडली. जातिव्यवस्थेचा आणि भटशाहीचा पराभव ही त्यांच्या कृति-कार्यक्रमाची ध्येये त्यांनी ठरवली. पुरुषशाहीचा पराभव करून स्त्रियांची मुक्ती होण्याच्या दृष्टीने कुटुंबपद्धतीची पुनर्रचना हा विचार व कार्यक्रम नंतरच्या काळात त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे अंग म्हणून पुढे आला. त्यांच्या ऐतिहासिक विचारसरणीच्या वैशिष्ट्यांमुळेच धर्म, संस्कृती, रूढी यांचा उच्छेद आणि कुटुंबपद्धतीची पुनर्रचना या गोष्टींवर ते भर देऊ शकले.

एका अर्थाने कुटुंबपद्धतीची पुनर्रचना हा एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारणा चळवळीचा मूळ आशय होता. विधवांचे पुनर्विवाह, बालविवाहावर बंदी, सतीप्रथेवर बंदी, स्त्री-शिक्षण इत्यादी या मोहिमेतील प्रमुख कार्यक्रम होते. पण बहुतेक समाजसुधारकांनी या सुधारणांचे नाते पितृसत्ताकतेच्या व जातिव्यवस्थेच्या पराभवासाठी कराव्या लागणाऱ्या मुक्तिलढ्याशी जोडले नव्हते. भूतदयावादी व बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टिकोन हाच त्यांच्या विचार-व्यवहाराचा मुख्य आधार होता. उलट ब्राह्मणी-हिंदू समाजरचना मुळात पवित्र आणि थोरच आहे, फक्त तिची काही वाईट अंगे कापावी लागणार अशाच समजुती घेऊन हे सुधारक काम करीत होते. यामुळे आणि त्यांच्या याही भूमिकांना सनातनी ब्राह्मणी समाजाकडून झालेल्या विरोधामुळे त्यांचा 'सुधारणावाद' फारसा पुढे जाऊ शकला नव्हता. हे सर्व लोक ताराबाई शिंदे, पं. रमाबाई यांच्या तथाकथित 'अतिरेकी' स्त्रीवादी भूमिकांवर सनातन्यांनी हल्ला केल्यावर म्हणूनच मूग गिळून गप्प बसले. अशा पार्श्वभूमीवर या समाजसुधारकांकडून पितृसत्ताकतेवर हल्ला केला जाणे सर्वार्थाने शक्य नव्हते.

उलट जोतीबा फुले जातिव्यवस्थेचा जाच भोगणाऱ्या बहुजन समाजातून पुढे आले होते आणि जातिव्यवस्थेच्या शोषणाविरोधी, शेतकऱ्यांच्या लुटीविरोधी मुक्तिलढ्याची भूमिका हा त्यांच्या विचार-व्यवहारांचा प्रमुख धागा होता. जुनी ब्राह्मणी धार्मिक परंपरा संपूर्णपणे फेकून, कष्ट करणाऱ्या जातींमध्ये असणारी बळीराजासारखी समतावादी परंपरा पुढे आणून नवीन, लूटविरहित, समताधारित, प्रेम व न्यायाधिष्ठित समाजव्यवस्था आणण्याचे ध्येय त्यांनी समोर ठेवले होते. त्यामुळे त्यांना पितृसत्ताकतेची तीव्रता आणि मूळ स्वरूप दिसणे इतर सुधारकांपेक्षा सहजपणे शक्य झाले. शूद्रातिशूद्र कष्टकरी जातींमध्येसुद्धा स्त्रियांची पुरुषांकडून दडपणूक होतच होती तरीही या स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने घराबाहेरही काम करीत होत्या आणि ब्राह्मणसदृश जातीच्या मानाने जास्त मोकळ्या होत्या. स्त्रियांच्या शेती व अन्य उत्पादनातला सहभाग फारच महत्त्वाचा होता व त्यामुळे अलीकडच्या काळापर्यंत बहुजन जातींमध्ये हुंडा पद्धत नव्हती. उलट मुलीच्या आई-वडिलांनाच (उत्पादन करणारी एक व्यक्ती त्यांच्या घरातून कमी झाली म्हणून) 'दहेज' देण्याची पद्धत होती. विवाहपद्धतीतसुद्धा ब्राह्मणांपेक्षा वेगळी होती.

जोतीबांनी सामाजिक-धार्मिक रीतिरिवाजांसह कुटुंबपद्धतीची पुनर्रचना करायचे ठरवले आणि बहुजन समाजातील स्त्रियांच्या तुलनात्मक स्वातंत्र्यामुळे याविषयी पावले टाकणे त्यांना सोपे झाले.

शूद्रातिशूद्र कष्टकऱ्यांच्या विवाहपद्धतीमध्ये ब्राह्मणी वैदिक रूढी नव्हत्या. त्यांचा आधार घेऊन फुल्यांनी पर्यायी विवाहपद्धतीविषयी विचार करायला सुरुवात

केली असावी. लग्न लावणारा ब्राह्मण हा घटक वगळून त्यांनी कुणीही लग्नविधी संघटित करू शकेल अशी साधी-सोपी पद्धत मांडली. विशेष म्हणजे त्यांच्या मांडणीमध्ये स्त्रियांसाठी समता आणि स्वातंत्र्य या गोष्टींवर मुद्दाम भर दिलेला आहे. १८८७ मध्ये सत्यशोधक समाजासाठी त्यांनी ही विवाहपद्धती मांडली. त्यासाठी त्यांनी लिहिलेल्या मंगलाष्टका त्यांच्या पितृसत्ताकविरोधी दृष्टिकोनाच्या दृष्टीने अभ्यासण्यासारख्या आहेत.

वधू विचारते (म्हणते),

> "आम्हा सर्व स्त्रियां असे बहुपिडा, हे नेणेशी तू कसे ।।
> स्वातंत्र्यानुभवाची ओळख आम्हा, झाली नसे मानसी ।।
> यासाठी अधिकार देशील स्त्रियां, घे आण त्याची अशी ।।"

वर आश्वासन देतो (म्हणतो),

> "स्थापाया अधिकार मी झटतसे, या बायकांचे सदा ।।
> खर्चाया न मनी मी भी किमपिही, सर्वस्व माझे कदा ।।
> मानीतो सकलां स्त्रियांस बहिणी, तू एकली मत्प्रिया ।।
> कर्त्याचे भय मी मनात तुजला, ठेवीन पोसावया ।।"

मग वधू 'लोकसेवेचे' काम एकत्रितपणे करण्याविषयी सांगते,

> "ठेवोनी अवघाचि भार झटुया, लोका कराया हिता ।।
> हाताला धरुनी तुला वरितसे, सर्वांपुढे मी आता ।।
> शुभमंगल सावधान ।।४।।

अशा प्रकारे जोतीबांनी नवीन सत्यशोधक विवाहपद्धती सुरू करून कुटुंबपद्धतीची पुनर्रचना करण्यासाठी पावले टाकायला सुरुवात केली. यानंतरच्या काळात भारतात अनेक नवीन विवाहपद्धती पुढे आल्या. तामिळनाडूमध्ये इ.व्ही. रामस्वामी पेरियार यांच्या नेतृत्वाखालील जातिव्यवस्थेविरोधी 'स्वाभिमानी चळवळ' या प्रवाहात 'स्वाभिमान विवाह' या नावाची पद्धत सुरू झाली. स्वातंत्र्य चळवळीत काही भागांत 'गांधी विवाह' पद्धत सुरू झाली होती. नंतर स्वतंत्र भारतात जुने हिंदू विवाह 'कायदे' बदलण्याचा प्रश्न पुढे आला. हिंदू स्त्रियांना वारसा हक्क देण्याबरोबरच विवाहपद्धत कशी असावी हाही प्रश्न उभा राहिला. विवाहाची 'कायदेशीर' नोंदणी पद्धतसुद्धा बऱ्याच मोठ्या प्रमाणात वापरात आणली जाऊ लागली. त्याचबरोबर कम्युनिस्ट चळवळीच्या काही भागांत वेगळ्या प्रकारचे लग्न समारंभ झाले. जयप्रकाश-आंदोलनाच्या काळात 'जयमाला' विवाहपद्धती पुढे आली. बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर महाराष्ट्रातील दलितांमध्ये बौद्ध विवाहपद्धत सुरू झाली. त्यातून एक दिसते की समाजपरिवर्तनाच्या बऱ्याच चळवळींच्या परिसरात नव्या नव्या विवाहपद्धती पुढे

आल्या आहेत. स्त्री-पुरुषांनी जुनी विषमता फेकून देऊन नवीन संबंध प्रस्थापित करण्याचा ज्या ज्या वेळी प्रश्न असेल त्या त्या वेळी त्यांच्या आयुष्यातल्या या अत्यंत महत्त्वाच्या समारंभात नवीन मूल्ये व्यक्त होणे आवश्यक बनते. या सर्वांमध्ये फुल्यांची सत्यशोधक विवाहपद्धती सर्वात पहिली आणि मूलभूत बदल करणारी आहे. इतर कोणत्याही विवाहपद्धतीपेक्षा स्त्रियांच्या गुलामगिरीच्या प्रश्नांची जाणीव आणि स्त्री-मुक्तीची आवश्यकता या पद्धतीत अत्यंत स्पष्ट व परखडपणे व्यक्त होते.

शेवटी जोतीबांनी त्यांच्या 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तका'त मानवी समाजासाठी व विशेषत: भारतातील बहुजन कष्टकरी समाजासाठी धार्मिक स्वरूपात नवीन मूल्ये प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले. यामध्ये स्त्रियांच्या प्रश्नांवर विशेष भर दिला आहे. या पुस्तकाच्या सर्व भागांमध्ये 'माणूस' या शब्दांतून 'स्त्री व पुरुष' दोन्ही व्यक्त होतात असे गृहीत न धरता 'सर्व एकंदर स्त्री-पुरुष' असे शब्द त्यांनी वापरले आहेत. स्त्रियांना सर्व प्रकारचे न्याय, स्वातंत्र्य, समता मिळाली पाहिजे हे त्यांनी स्पष्ट केले आहे.

"सत्य वर्तन करणारे कोणास म्हणावे?" या प्रश्नाला उत्तर देताना जोतीबा म्हणतात :

"१. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व प्राणिमात्रास उत्पन्न केले त्यांपैकी स्त्री-पुरुष हे उभयता जन्मत: स्वतंत्र व एकंदर अधिकारांचा उपयोग घेण्यास पात्र केले आहेत, असे कबूल करणारे, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत...

"६. आपल्या सर्वांच्या निर्मिकाने एकंदर सर्व स्त्री-पुरुषांस एकंदर सर्व मानवी अधिकारांचे मुख्य धनी केले आहेत. त्यातून एखादा मानव अथवा काही मानवांची टोळी एखाद्या व्यक्तीवर जबरी करू शकत नाही व त्याप्रमाणे जबरी न करणारास, त्यास सत्यवर्तन करणार म्हणावेत...

"२२. स्त्री अथवा पुरुष, जे आपल्या कुटुंबासह, आपल्या भाऊबंदास, आपल्या सोयऱ्याधायऱ्यास आणि आपल्या इष्टमित्र साथ्यांस मोठ्या तोऱ्याने पिढीजादा श्रेष्ठ मानून आपल्यास पवित्र मानीत नाहीत आणि एकंदर सर्व मानवी प्राण्यास पिढीजादा कपटाने अपवित्र मानून त्यांस नीच मानीत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत...

"२६. स्त्री अथवा पुरुष, जे शेतकरी अथवा कलाकौशल्य करून पोटे भरणारास श्रेष्ठ मानितात; परंतु शेतकरी वगैऱ्यांस मदत करणारांचा आदर-सत्कार करीतात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

"२७. स्त्री अथवा पुरुष, जे चांभारांच्या घरी का होईना, बिगाऱ्याचा धंदा करून आपला निर्वाह करणाऱ्यांस तुच्छ मानीत नाहीत, परंतु त्या कामी मदत करणारांची वहावा करितात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत." (फुले समग्र वाङ्मय, पृ. ४११-४१४)

'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तका'त मांडलेल्या विचारात उच्च-नीच उतरंडीविरोधी, श्रम करणाऱ्यांना मान देणारी, लोकशाहीवादी व लूटविरोधी अशी मूल्ये खास पद्धतीने मांडली आहेत. पण या मांडणीचे वैशिष्ट्य म्हणजे तिच्यात स्त्रियांचा खास उल्लेख कटाक्षाने केला आहे. स्त्री-पुरुष समानतेचे महत्त्व जोर देऊन मांडण्याचा प्रयत्न केला आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तका'चे हे वैशिष्ट्य आहे.

■

# "स्थापाया अधिकार मी झटतसे"

फ्रेंच व अमेरिकन क्रांतीनंतर जगात नवीन क्रांतिकारक लोकशाही विचार पसरायला लागले. ब्रिटिश भांडवलदारांनी भारतावर लादलेल्या त्यांच्या राज्याच्या संदर्भात कारखाने, रेल्वे व रस्त्यांबरोबरच या नवीन संकल्पना, मूल्ये आणि मानवी आदर्श भारतात पोहोचू लागले. ही नवी लोकशाही विचारसरणी आणि त्यांच्यावर आधारित सामाजिक-राजकीय संस्था या केवळ भांडवलशाही व्यवस्थेला आवश्यक आहेत म्हणून प्रस्थापित झाल्या नव्हत्या. लाखोंच्या संख्येने राबणाऱ्या जनतेने, शेतकरी, कामगार, कारागीर इत्यादींनी संघर्ष करून प्रत्यक्षात आणलेल्या या गोष्टी होत्या. भारतातसुद्धा नवीन शिकलेल्या उच्च जातींमध्ये मुळात सरंजामी कुटुंबात जन्मलेल्या पांढरपेशा विभागाने या लोकशाही मूल्यांचा एक भाग उचलून धरला — 'देशाला राजकीय स्वातंत्र्य पाहिजे.' पण बहुजन समाजातून पुढे आलेले जोतीबा फुले आणि त्यानंतर दलित समाजातून पुढे आलेले बाबासाहेब आंबेडकर यांनी मात्र सार्वत्रिक मानवी हक्कांचा, सर्व एकंदर स्त्री-पुरुषांच्या अधिकाराचा पुकारा केला. या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी सरंजामी जातिव्यवस्थेविरुद्ध, भटशाहीविरुद्ध लढा पुकारला.

या संदर्भातसुद्धा मार्क्स आणि फुले यांची तुलना करता येते. मार्क्सने 'राजकीय' स्वातंत्र्याच्या पलीकडे जाऊन, राजकीय समतेच्या पाठीमागे जाऊन सामाजिक-आर्थिक विषमता व शोषण व्यवस्था तपासली. या विश्लेषणाच्या आधारावर त्याने कामगारवर्गाच्या नेतृत्वाखाली समाजवादी क्रांतीची भूमिका मांडली. मार्क्सप्रमाणे फुल्यांनी 'शास्त्रीय समाजवादी' पद्धतीने विश्लेषण देण्याचा प्रयत्न केला नाही. पण जर 'स्वातंत्र्य, समता, बंधुत्व' भारतात स्थापन व्हायचे तर शूद्रातिशूद्र कष्टकऱ्यांना मानवी अधिकार पाहिजेत असा विचार त्यांच्या भूमिकेत होता. या धाग्याला धरून त्यांनी भटशाही, जातिव्यवस्था, शासन यांच्या माध्यमातून होणारे शोषण, लूट आणि धार्मिक फसवणूक यांच्याविरुद्ध मुक्तिलढा करण्याची दिशा मांडली. त्यासाठी जोतीबांनी शोषण व लुटीचे विश्लेषण देण्याचा प्रयत्न केला. त्या दृष्टीने त्यांनी त्या

काळात त्यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारावर आणि लोकपरंपरेतील अंतर्विरोधी व्यवहारांच्या आधारावर बहुजन-दलित समाजाच्या, स्त्रियांच्या शोषणाचा इतिहास मांडला. मार्क्सप्रमाणे त्यांनी स्वत:च्या पद्धतीने एक प्रकारचा 'ऐतिहासिक भौतिकवादी' दृष्टिकोन मांडला.

'राजकीय, मानवी हक्क हे फक्त व्यक्तींचे किंवा देशाच्या कक्षेत बघण्याचे प्रश्न नाहीत तर सार्वत्रिकपणे सर्व समाजाच्या पातळीवर त्यांना प्रस्थापित करण्याचा विचार झाला पाहिजे. समाजात केवळ अलग व्यक्ती नसतात तर एकमेकांविरोधी हितसंबंध असणारे सामाजिक विभाग असतात. शोषण, लूट करणारे आणि ज्यांचे शोषण व लूट होते असे विभाग असतात. ही सर्व शोषण व लूट करणारी व्यवस्था अनादी-अनंत अशी नाही. ती इतिहासातील एका विशिष्ट प्रक्रियेमधून तयार झाली आहे आणि ती भविष्यात नष्ट केली जाऊ शकते.' जोतीबांच्या ऐतिहासिक भौतिकवादी मांडणीत हे मुद्दे मार्क्सप्रमाणेच आले आहेत.

पण याचबरोबर फुले आणि मार्क्स यांच्या दृष्टिकोनात महत्त्वाचा फरकसुद्धा आहे. 'वर्ग'ऐवजी फुल्यांनी 'जात' संबंध हे शोषणाचे साधन म्हणून मांडले. 'भांवलशाही'ऐवजी 'भटशाही', 'नोकरशाही' यांच्यावर हल्ला केला. जोतीबांच्या विश्लेषणात हिंसाचार, लूट, शासनयंत्रणेकडून होणारी लुबाडणूक, धार्मिक फसवणूक, ज्ञान-शिक्षणापासून मुद्दाम वंचित ठेवणारी व्यवस्था या गोष्टींवर भर दिला आहे. यात मार्क्स व मार्क्सवाद्यांनी दुर्लक्षिलेले काही सामाजिक वास्तव पुढे आले आहे. पण फुल्यांच्या काही मर्यादाही यातूनच दिसतात. उदाहरणार्थ, जर आर्यभट्टांनी स्वाऱ्या करून जबरदस्तीने सत्ता स्थापन केली होती तर त्याच न्यायाने ब्रिटिश भांडवलदारांचे राज्य जबरदस्तीनेच प्रस्थापित झाल्यावर ब्राह्मणांची सत्ता कोणत्या आधारावर राहते? ब्रिटिश राज्यकर्ते मुळातच शेतकऱ्यांची लूट करण्यापासून मुक्त होते काय? अशा प्रश्नांना फुल्यांनी स्पष्ट उत्तर दिलेली नाहीत. (जी नंतर आंबेडकरांनी दिली.)

फुल्यांच्या मांडणीमध्ये धर्म, संस्कृती, जागृती या अंगांवर विश्लेषण केले गेले आहे. त्यांनी मांडलेला लुटीचा इतिहास उत्पादनसंबंध, उत्पादनपद्धती यामध्ये घडत गेलेल्या बदलांच्या इतिहासाला जोडलेला नाही. त्यामुळे नवीन समताधिष्ठित समाजाचा भौतिक पाया त्यांनी स्पष्ट केलेला नाही. (उदाहरणार्थ, जसे मार्क्सला वाटले होते की औद्योगिक क्रांती आणि उत्पादनशक्तींचा विकास समाजवादाला भौतिक पाया देणार.) उलट त्यांचा सर्व भर धार्मिक-सांस्कृतिक पायावर आहे.

स्त्रियांच्या प्रश्नांबाबत त्या काळाच्या दृष्टीने जोतीबांची भूमिका वैशिष्ट्यपूर्ण होती. त्यांनी स्त्रियांच्या चळवळीला प्रोत्साहन देणारा विचार मांडला. विशेषत: त्यांनी

पं. रमाबाई आणि ताराबाई शिंदे यांना समर्थन देऊन त्यांच्यापासून शिकून स्त्रियांच्या गुलामगिरीचे मूळ असलेल्या पितृसत्ताकतेकडे खास लक्ष दिले. त्यामुळे केवळ शूद्र किंवा अतिशूद्र जातींचा भाग म्हणून किंवा शेतकरी म्हणून नव्हे तर 'स्त्री म्हणून' शोषण कसे होते या अनुषंगाने त्यांनी मांडणी केली. मार्क्स-एंगल्सप्रमाणे त्यांनी खोलात जाऊन सैद्धान्तिक विश्लेषण मांडलेले नाही. पण या दोघांच्या मांडणीमध्ये स्त्रियांकडे कामगारवर्गाचा भाग म्हणूनच पाहिले गेले आहे. या आधारावर आणि खाजगी मालमत्तेच्या प्रस्थापनेतून स्त्रियांची गुलामगिरी सुरू झाली. या निष्कर्षामुळे समाजवादी क्रांती झाली, खाजगी मालमत्ता नष्ट झाली की स्त्रियांचे प्रश्न 'आपोआप' सुटणार अशी मार्क्स-एंगल्सच्या विचारांची दिशा राहिली. याउलट अगदी शूद्रातिशूद्र कष्टकरी जातीतील कुटुंबामध्येसुद्धा स्त्रियांची गुलामगिरी किती तीव्र आहे हे फुल्यांनी जोर देऊन आणि अत्यंत परखडपणे मांडले. कुटुंबपद्धतीची पुनर्रचना करण्याचा कार्यक्रम सुचवून या प्रश्नावर खास कृती करण्याची गरज म्हणूनच जोतीबांनी पुढे आणली.

सारांश, फुल्यांच्या वैचारिक विश्लेषणात्मक मर्यादांमुळे ते पितृसत्ताकतेचे संपूर्ण स्वरूप स्पष्ट करणारी मांडणी करू शकले नाहीत. पण त्याचबरोबर हेही सत्य आहे की, जोतीबांच्या मृत्यूनंतर शंभर वर्षांनीसुद्धा आपण अजून स्त्रियांच्या गुलामगिरीचे नेमके स्वरूप उघड करण्याच्या शोधात आहोत. स्त्री-मुक्तीचा व्यापक समुदाय लढा उभा राहण्यासाठी कार्यक्रम शोधण्याच्याच प्रक्रियेत आहोत. शंभर वर्षांपूर्वी स्पष्ट स्त्री-मुक्तिवादी भूमिका घेणाऱ्या जोतीबांनी या शोधाची सुरुवात केली होती. त्यासाठी कार्यक्रम देण्याच्या ठोस प्रयत्नांना सुरुवात केली होती.

■

# स्त्री-मुक्ती विचारांची पुढची झेप

जोतीबा फुल्यांच्या स्मृती शताब्दी वर्षाच्या निमित्ताने स्त्री-मुक्ती विचारांची व व्यवहाराची पुढची दिशा कोणत्या आधारावर विकसित करायची याचा विचार होणे गरजेचे आहे.

फुले आणि मार्क्स या दोघांच्याही मांडणीत या संदर्भात त्रुटी दिसतात. या दोन्ही विचारांतील पुढे नेणाऱ्या अंगांची सांगड घालून मार्ग शोधायला कशी मदत होईल हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. पण जे लोक मार्क्सवाद-फुलेवाद यांचे एकत्रीकरण करण्याविषयी मत मांडतात त्यांचा विचार फारच वरच्या पातळीवर होतो असे दिसते. औद्योगिक भांडवलशाहीच्या केंद्रामध्ये वावरणाऱ्या मार्क्सने वर्गीय विषमता ही शोषणाच्या विश्लेषणातली एक महत्त्वाची संकल्पना आधारभूत धरली. भांडवलदारवर्ग आणि कामगारवर्ग यांच्यातला वर्गसंघर्ष केंद्रीभूत मानला. वर्गीय शोषणाचे मूळ भांडवली 'खाजगी' मालमत्तेत असल्याचे विश्लेषण दिले. या तुलनेत वसाहतवादाच्या टाचेखाली जातीय सरंजामदारीच्या कचाट्यात असलेल्या व शेतीप्रधान भारतीय वातावरणात वावरणाऱ्या फुलेंनी 'जात' हे शोषणाचे मुख्य साधन मांडले. 'भटशाही' आणि 'शूद्रातिशूद्र' यांच्यातला संघर्ष केंद्रीभूत मानला. शोषणाच्या संदर्भात खाजगी मालमत्तेचा विचार करण्याऐवजी जातिव्यवस्थेच्या विचार केला. या पातळीवर मार्क्स व फुले यांच्या संकल्पनांची तुलना होऊ शकते. काही बाबतीत त्यांचे विचार एकमेकांना पूरक होते असेही म्हणता येते. पण अशा बेरजेच्या पद्धतीतून (किंवा वजाबाकीतून) या दोन्ही विचारांचा 'संयोग' असलेला नवा विचार जन्माला येत नाही. अलीकडच्या काळामध्ये 'वर्ग आणि जात', 'वर्ग, जात आणि लिंग', 'वर्ग आणि वंश' या संदर्भातील शोषणाच्या समस्यांना बेरजेच्या पद्धतीने एकत्रित आणण्याचे अनेक प्रयत्न जगभर चालू आहेत. वेगवेगळ्या चळवळींमध्ये या संदर्भात चाललेल्या सैद्धान्तिकदृष्ट्या निरुपयोगी प्रयत्नांप्रमाणेच मार्क्स-फुले यांच्या विचारांना एकत्र आणण्याच्या प्रयत्नांची गत झाली आहे. या सर्वातून 'वर्ग', 'जात', 'लैंगिक संबंध' या संकल्पनांच्या बाबतीत काही नवी दृष्टी पुढे आलेली नाही किंवा मुक्तीचा नवीन

कार्यक्रम विकसित झालेला नाही.

खरे म्हणजे मार्क्सच्या प्रयत्नांचा आवाका शोषणाचे मुख्य संदर्भ 'वर्ग' आणि 'खाजगी मालमत्ता' आहेत असे म्हणण्यापलीकडे कितीतरी मोठा होता. वरवर दिसणाऱ्या गोष्टींच्या पडद्यामागे जाऊन; सामाजिक अंतर्विरोध, शोषण, परात्मभाव या प्रक्रियांचा शोध घेण्याचा प्रयत्न त्याने केला. या सर्वांचा भौतिक आधार शोधण्याचा प्रयत्न त्यामध्ये महत्त्वाचा होता. याच शोधातून मार्क्सने सामाजिक जागृती ही सामाजिक अस्तित्वाच्या स्वरूपावरून ठरते; जागृतीवरून सामाजिक अस्तित्वाचे स्वरूप ठरते असे नाही हा सिद्धान्त मांडला. गुलामगिरी, दडपणूक आणि शोषण यांचा विकास या दृष्टीने मार्क्सने इतिहासाकडे पाहिले. पण त्याचबरोबर इतिहासातील मानवमुक्तीचे लढे आणि त्यांच्यातील वाढती सुप्त शक्ती यांची त्याने कटाक्षाने नोंद घेतली. निसर्गाला आणि त्याच्याबरोबर स्वत:ला बदलत जाणाऱ्या माणसांच्या समाजात मार्क्सने माणसांच्या उत्पादक भूमिकेला महत्त्व दिले. समाजविकासाच्या प्रक्रियेत उत्पादनशक्तींचा विकास निर्णयात्मक भूमिका बजावीत असतो या अंगावर त्याने भर दिला. उत्पादन, स्वत: उत्पादन करणाऱ्यांकडून वरकड मूल्य ओरबाडून घेण्याची प्रक्रिया या संदर्भात त्याने शोषणाची व्याख्या केली. या शोषणाविरुद्धचा लढा म्हणजे इतिहास घडवणारी चैतन्यशील शक्ती असते असे प्रतिपादन केले. अशा अगदी व्यापक अर्थाने मार्क्सने म्हटले आहे, ''सर्व लिखित इतिहास हा वर्गलढ्यांचा इतिहास आहे.'' इतिहासाविषयीचे हे स्पष्ट सत्य त्याच्या विश्लेषणातून पुढे आले आहे.

पण या दृष्टिकोनातून केले गेलेले भांडवली व्यवस्थेचे विश्लेषण अपुरे आणि संकुचित ठरले आहे. एकदा खाजगी मालमत्ता हीच शोषणाचा आधार आहे असे म्हटल्यावर बळाचा वापर आणि हिंसाचार यांच्यासह इतर सर्व अंगांकडे दुर्लक्ष केले गेले. ही इतर अंगे खुद्द मार्क्सने भांडवलशाहीच्या पूर्वेतिहासाचा भाग मानली. प्राथमिक भांडवल संचयाचा कालखंड मानला. भांडवली व्यवस्थेच्या सतत चालू राहणाऱ्या प्रक्रियांमध्ये ती महत्त्वाची भूमिका बजावतात याची नोंद घेतली नाही. मार्क्सवाद्यांनी तर केवळ 'उत्पादनसाधनांशी संबंधित असलेले समाजविभाग' अशा स्वरूपात 'वर्ग' संकल्पनेचा अर्थ लावला. कुटुंब, लैंगिक संबंध या गोष्टींचे स्पष्टीकरण देताना येणाऱ्या समस्यांकडे दुर्लक्ष केले. जमात, भाषा, राष्ट्रीयत्व, वांशिक स्वरूप, धर्म, संस्कृती अशा प्रकारचे जे अनेक घटक मानवी समूहांना आकार देतात ते भांडवली विकासाच्या प्रक्रियेत पाचोळ्यासारखे उडून जातील असे मानण्यात आले. या सर्वातून फक्त भांडवलदार आणि कामगार असे दोन वर्ग अगदी स्पष्ट स्वरूपात एकमेकांसमोर येतील अशी भूमिका या दृष्टिकोनातून पुढे आली. ही

भूमिका केवळ जागतिक पातळीवरच नव्हे तर युरोपच्या कक्षेमध्येसुद्धा केवळ भांडवलीपूर्व समाजांच्या बाबतीतच नव्हे तर गतिमान भांडवलशाहीच्या बाबतीतसुद्धा अपुरी ठरली. जरी मार्क्सने 'पॅरिस कम्यून'च्या ऐतिहासिक अनुभवातून धडा घेऊन शासनसंस्था व एकंदर राजकीय व्यवस्था नव्या पद्धतीने उभी करण्याची भूमिका घेतली होती तरी त्याच्या बहुसंख्य अनुयायांनी 'शासनसंस्था ताब्यात घेणे' हेच आपले ध्येय मानले. खरी समस्या अशी आहे की ज्या वेळी मार्क्सवाद वसाहतवादाच्या टाचेखालील 'मागासलेल्या' तिसऱ्या जगातील समाजांमध्ये महत्त्वाचा बनला त्या वेळी मार्क्सवादाची विचारपद्धती घेऊन तिची पुनर्मांडणी करण्याची कुवत असू शकणाऱ्या शोषित विभागांपर्यंत तो पोहोचला नाही. त्याऐवजी उच्च जातीय बुद्धिवाद्यांकडे तो पोहोचला, त्या त्या देशातल्या या तऱ्हेच्या विभागांनी तो आपलासा केला. मार्क्सवादाचा अपुरेपणा या विभागाच्या हितसंबंधांना पोषकच ठरला. त्यामुळे त्याची पुनर्मांडणी करण्याची गरज या मंडळींना वाटली नाही.

भारतीय ब्राह्मण आणि भद्रलोक बुद्धिवाद्यांची शक्ती शिक्षण आणि नोकरीमध्ये सामावलेली होती. त्यामुळे खाजगी मालमत्तेला शोषणाचा मुख्य आधार मानणे त्यांना फारच सोईचे होते. राष्ट्रीयीकरण, सार्वजनिक विभागाच्या माध्यमातून झालेले औद्योगिकीकरण, केंद्रित नोकरशाही शासनयंत्रणेचा ताबा घेणे या सर्व गोष्टी कामगारवर्गाच्या आणि समाजवादाच्या नावाखाली करता येणे शक्य आहे! आणि अशा प्रक्रियेत खाजगी भांडवलदार जरी गेले तरी नव्या व्यवस्थेला शासकीय व्यवस्थापक, नोकरशहा इत्यादी लागतातच. त्यामुळे संकुचित पद्धतीने अर्थ लावलेला मार्क्सवाद भारतासारख्या देशांमध्ये उदयोन्मुख बुद्धिवाद्यांच्या हातातले वर्चस्व गाजवण्याचे साधन बनणे सहज शक्य होते. यातूनच हा बुद्धिवादी 'वर्ग' नव्या समाजाचा 'नवा वर्ग' बनण्याच्या शक्यतांची बीजे रोवली जातात.

शोषण-दडपणुकीच्या या नव्या पद्धतीविरुद्ध जगभर चाललेला उठाव आज आपल्या डोळ्यांसमोर आहे. त्यातून एक वाईट गोष्टही घडते आहे – काही ठिकाणी या उठावाने भांडवली व्यवस्थेकडे जाणारे वळण घेतले आहे. मार्क्सवादाची मानवमुक्तीची योजना आता मृत झाली आहे असा याचा अर्थ बिलकूलच नाही. मार्क्सवाद्याने आता नव्या तऱ्हेने या मुक्ती मोहिमेची सुरुवात करणे आवश्यक आहे. जोतीबा फुलेंसारख्या शेतकरी आणि बहुजन जातींमधून आलेल्या स्त्री-पुरुषांनी उभे केलेले प्रश्न आणि मांडलेल्या कल्पना याचा आधार घेणे त्यासाठी आवश्यक आहे.

स्त्रियांच्या दडपणुकीच्या समस्येचा संदर्भ याबाबतीत जास्त स्पष्टता देऊ शकेल. एंगल्सने 'खाजगी मालमत्ता, कुटुंब आणि शासनसंस्था यांचा उगम' हे पुस्तक मार्क्सवादी विश्लेषणाचा एक उत्कृष्ट नमुना आहे, फक्त त्यामध्ये 'स्त्री-जातीचा

जागतिक ऐतिहासिक पराभव' हा खाजगी मालमत्तेच्या उदयातून निर्माण झालेल्या दुय्यम शोषणाची बाब मानली आहे. यातच स्त्रियांच्या दडपणुकीविषयीच्या विश्लेषणाचा कमकुवतपणा स्पष्ट होतो. एंगल्सने पितृसत्ताक कुटुंबव्यवस्था बदलण्याची आवश्यकता जरूर मांडली आहे. पण खाजगी मालमत्ता नष्ट करून समाजवादाची प्रस्थापना केल्यावर हे जवळ जवळ आपोआप घडेल असे त्याला वाटत असल्याचेच दिसते. त्याच्या दृष्टीने कामगारवर्गीय कुटुंबात पुरुषप्रधानतेचा प्रश्न जवळ जवळ नसल्यातच जमा होता.

याउलट फुल्यांनी पुरुषप्रधानता आणि पितृसत्ताकतेवर प्रकाशझोत टाकला आहे. आणि अगदी शोषित बहुजन समाज कुटुंबातसुद्धा स्त्रियांची दडपणूक हा अगदी ठोस महत्त्वाचा प्रश्न असल्याची मांडणी केली आहे. ज्यांचे स्वत:चेच जातिव्यवस्थेतून शोषण होते तेच शूद्रातिशूद्र पुरुष स्त्रियांचे मात्र स्वत: शोषण करतात हे त्यांच्या विचारात स्पष्ट आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक विचारसरणीविषयी नवी पर्यायी मांडणी करताना त्यांनी स्त्रियांची समता हा एक महत्त्वाचा मुद्दा बनवला आहे. असे असूनही शेवटी एक महत्त्वाची नोंद घेतली पाहिजे ती ही की फुले या प्रकारचे विचार त्यांच्या अखेरच्या आयुष्यात मांडू लागले. त्या काळात निर्माण होत असलेल्या स्त्रियांच्या परखड विचार-व्यवहाराच्या अनुभवानंतर मांडू लागले.

लूट, हिंसाचार, स्वाऱ्या, उत्पादन, शोषण यांच्या मानवी इतिहासाकडे तिहेरी पिळवणूक होणाऱ्या दलित-बहुजन कष्टकरी जातींमधील स्त्रियांच्या दृष्टिकोनातून पाहण्याची योजना ते कशीतरी सुरू करू शकले एवढेच म्हणता येईल. शोषक आणि शोषित यांच्यातला संघर्ष, भांडवलदार व कामगारवर्गातला संघर्ष आणि वेगवेगळ्या प्रकारच्या उत्पादनांची (घरातले जेवण बनवणे धरून) भांडवली व्यवस्थेच्या संदर्भातली भूमिका या सर्वांची नव्याने व्याख्या करण्याकडे ही शोधाची दिशा आपल्याला घेऊन जाते.

जोतीबा फुल्यांच्या स्मृती शताब्दीच्या निमित्ताने ही शोधाची दिशा पुढे नेण्याची, नव्या पद्धतीने प्रकाशझोत टाकण्याची, शोषण आणि संघर्षाच्या व्याख्यांची पुनर्मांडणी करण्याची मोहीम हाती घेणे आवश्यक आहे.

■

124302
31.3.08

I. I. A. S. LIBRARY

Acc. No.

This book was issued from the library on the date last stamped. It is due back within one month of its date of issue, if not recalled earlier.

CP&SHPS—519-I.I.A.S./2004-25-6-2004-20000.

Library IIAS, Shimla

MR 891.468 A 95 J

00124302

# आमची इतर प्रकाशने

- **जोतीबा फुले आणि स्त्री-मुक्तीचा विचार**
  डॉ. गेल ऑम्व्हेट — २० रु.
- **महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य**
  प्रा. तानाजी ठोंबरे — २० रु.
- **महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ**
  डॉ. अशोक चौसाळकर — २० रु.
- **जोतीरावांची समता-संकल्पना**
  भास्कर लक्ष्मण भोळे — २० रु.
- **महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष**
  भारत पाटणकर — २० रु.
- **महात्मा फुले आणि धर्म**
  आ. ह. साळुंखे — २० रु.
- **डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार**
  प्रा. म. द. देशपांडे — ३० रु.
- **डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय चळवळी**
  कृष्णा मेणसे — ३० रु.
- **आगरकरांचे धर्मचिंतन**
  भा. ल. भोळे — ४० रु.
- **आगरकरांचे राजकीय विचार**
  डॉ. अशोक चौसाळकर — ४० रु.
- **आगरकरांचे सांस्कृतिक आणि साहित्यविषयक विचार**
  प्रा. तानाजी ठोंबरे
- **आगरकर विचार**
  भा. ल. भोळे / अशोक चौसाळकर /

Library IIAS, Shimla
MR 891.468 A 95 J
00124302